# सारस्वत चैतन्य

वर्ष : ३८ । अंक : २ । मुंबई । जुलै–सप्टेंबर २०२३ । एकूण अंक क्र. : १५० । पाने : ४८ । किंमत २० रुपये
Year : 38 | Issue : 2 | Mumbai | July-September 2023 | Total Issue no. : 150 | Pages : 48 | Price 20 Rupees



## तुमच्या स्वप्नांना भरारी द्या एन्केजीएस्बी बँकेच्या कर्जयोजनांसवे

**NKGSB Co-operative Bank Ltd.** (Multi-State Scheduled Bank)

SINCE 1917

### कार लोन

**8.30 %** वार्षिक पासून

कालावधी 7 वर्षांपर्यंत

FASTAG सुविधा उपलब्ध







### गृह कर्ज

₹ 1.40 कोटीं पर्यंत कर्ज

कालावधी 20 वर्षांपर्यंत

**8.25 %** वार्षिक पासून

### शैक्षणिक कर्ज

विद्यार्थीनींसाठी **9.00 %** वार्षिक

9.25% वार्षिक - विद्यार्थ्यांसाठी व्याजदर

प्रीमियर संस्थांसाठी 0.25% सवलत- IIT, IIM, IISC, ISB.

मोरॅटोरियम सुविधा उपलब्ध







### डॉक्टर लोन

₹ 5 कोटीं पर्यंत कर्ज

मोरॅटोरियम सुविधा उपलब्ध

**9.00 %** वार्षिक पासून

### शॉप लोन

**9.50 %** वार्षिक

₹ 5 कोटीं पर्यंत कर्ज

कालावधी 12 वर्षांपर्यंत




कर्ज योजनेचा लाभ घेण्यासाठी जवळच्या शाखेस भेट द्या किंवा ह्या क्रमांकावर मिस्ड कॉल द्या 022 28602020


BUSINESS FINANCING. WE KNOW HOW YOU CAN GROW!
Presenting
SVC MSME SOLUTIONS
The Stepping Stone For Rising India!
Choose from our wide range of 360° finance solutions tailor-made for MSMEs:
Working Capital (Fund Based)
Cash Credit
OD against Property
Export Finance
Bill Discounting Facilities
Working Capital (Non-Fund Based)
Letter of Credit
Bank Guarantee
Term Loans
Purchase of Machinery
Purchase of Property
Expansion of Business
Simplified Forex Solutions for Exporters and Importers
Loan Against Property
Why Bank with SVC?
Export Finance
Bill Discounting Facilities
Perferred financing partner by SMEs
Access to Corporate internet Banking
*Terms & Conditions Apply
SVC CO-OPERATIVE BANK LTD.
(Multi-State Scheduled Bank)
ESTD.1906
HUM SE HAI POSSIBLE
(Formerly The Shamrao Vithal Co-op Bank Ltd.)
To avail, call 24X7 on
1800 313 2120
SVCBankIndia
svc-bank
SVC_Bank
svc_bank
svcbank.com


उत्सव निसर्गाचा,
श्वास सुखाचा
गोव्यातील सुखसमृद्धीला,
वरदहस्त मंगेशाचा!
देखणा निसर्ग
प्रदूषणमुक्त हवा
उत्कृष्ट बांधकाम
मुबलक पाणी
मंगेशीचा मंगेश,
मारदोळची म्हाळसा,
वेलिंगचा नृसिंह,
मडकईची नवदुर्गा
अशा अतिशय प्रसिद्ध
मंदिरांच्या सान्निध्याने
पवित्र झालेला परिसर
सुखसमृद्धी
मंगेशीच्या देवळापासून दोन मिनिटांच्या अंतरावर
मंगेशी, फोंडा - गोवा
फ्लॅट्स उपलब्ध :
१ रूम किचन,
१ बी.एच.के.,
२ बी.एच.के.
प्रोजेक्ट मान्यता :
गोवा टाउन प्लॅनिंग
कर्ज सहाय्य :
नामवंत वित्त संस्था
A project by:
KCC
कुणाल कन्स्ट्रक्शन कंपनी
संपर्क : मुंबई - कल्पना केरकर : 9820933352 • जितेंद्र वैती : 9833636451
Airtel Landline +91 22 40153980 • Email : kunalconstructiongoa@yahoo.in • Web : www.kccgoa.in
गोवा - नरेश केरकर : 9422639188 • के. विनोद : 9975975782, 8698269174

श्रद्धाच तुझी कवळील विश्वबंधुत्व

# सारस्वत चैतन्य

वर्ष : ३८ । अंक : २ । जुलै-सप्टेंबर २०२३ । एकूण अंक क्र. : १५०

Year : 38 | Issue : 2| July-September 2023 | Total Issue no. : 150



**कै. प्रफुल्लदत्त**
संस्थापक-संपादक
(१९८६-१९८७)



**कै. रवींद्र पाटकर**
संपादक
(१९८७-२०१०)

**संपादक :**
सुधाकर लोटलीकर

**विश्वस्त मंडळ**

**अध्यक्ष :**
दिलीप भिसे

**कार्याध्यक्ष :**
राजेंद्र देसाई

**कार्यवाह :**
राहुल साखळकर

**संयुक्त कार्यवाह :**
प्रसाद कुलकर्णी

**कोषाध्यक्ष :**
दीपक मुळ्ये

**विश्वस्त :**
प्रमोद तेंडुलकर । सुधाकर लोटलीकर
नीलेश रांगणेकर । मयुरेश पाडगांवकर

www.saraswatprakashan.org
Email : Chaitanyamag@gmail.com

**देणगी**

हितचिंतक : ३,५००/-
आश्रयदाता : ६,०००/- । आधारस्तंभ : १०,०००/-
(अधिक माहितीसाठी अंकातील निवेदन पाहावे.)
**देणगीदार, जाहिरातदारांना विनामूल्य अंक**

**: पत्रव्यवहाराचा पत्ता :**
सारस्वत प्रकाशन, सारस्वत भवन, दुसरा मजला, खोली नं. १०,
छत्रपती शिवाजी महाराज पथ (मोगल लेन), माहीम (पश्चिम),
मुंबई - ४०० ०१६
संपर्क : सोमवार ते शनिवार, सायंकाळी ५ ते ७ (मो. ८७७९७५८०८५)

**- या अंकातील मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही -**

# आधारस्तंभ

**व्यक्ती**

- श्री. रघुवीर सीताराम मंत्री
- श्री. प्रकाश दामोदर कामत
- डॉ. प्रेमानंद भि. पै-धुंगट
- श्री. मंगेश रंगनाथ भांडारकर
- श्री. हेमंत शरद पै
- श्री. सुबोध आर. नेमळेकर
- श्रीमती स्नेहलता कुळकर्णी
- सौ. अरुंधती अ. किनरे
- डॉ. प्रेमानंद शांताराम रामाणी
- सौ. प्रतिमा प्रेमानंद रामाणी
- श्री. नाथ रामानंद लाड
- श्री. शशिकांत गोविंद तोरणे
- श्री. अजित एन. गुंजीकर
- श्रीमती उर्मिला उमेश कोचरेकर
- श्री. श्रीकांत नरहरी वागळे
- श्री. सुरेश यशवंत कावतकर
- श्री. सुरेश बोरकर
- श्री. केशव गुरुनाथ शेटे
- श्री. मोरेश्वर महादेव सबनीस
- डॉ. शरदचंद्र एस. गायतोंडे
- श्रीमती सीमा लक्ष्मीकांत नेरुरकर
- श्री. रमेश भट
- श्री. किशोर गुरुदास मासुरकर
- श्री. श्याम शंकर कुळकर्णी
- श्री. भालचंद्र महादेव ऊर्फ दीपक पिंगे
- श्री. अजित सत्येंद्रनाथ रेगे
- ॲड. समीर मनोहर तेंडुलकर
- डॉ. वामन शांताराम खटकूळ
- श्री. कृष्णा गजानन तेंडुलकर
- सौ. क्षमा श्रीराम पालेकर
- श्री. अमित अनिल पंडित
- श्री. विश्वास गजानन तेंडुलकर
- श्री. भालचंद्र प्रभाकर जुवळे
- डॉ. हेमंत मधुकर हळदवणेकर
- डॉ. अनुराधा प्रकाश सामंत

- श्री. शशिकांत केशव साखळकर
- श्री. पुरुषोत्तम एस. साखळकर
- श्री. केतन यशवंत कामत
- ॲड. प्रसाद ज्ञानेश्वर बोरकर
- श्री. राजेंद्र बाळकृष्ण देसाई
- सौ. विजयालक्ष्मी विष्णू कर्नाटकी
- श्री. गुरुप्रसाद व्ही. सामंत
- श्री. राजेश मेघश्याम नाडकर्णी
- श्री. दीपक भास्कर पंडित
- डॉ. उल्हास रामचंद्र तेंडुलकर
- श्री. सुहास बी. पोतकर
- श्री. सुभाष लक्ष्मण सराफ
- श्री. सुबोध श्रीकांत हरमळकर (संझगिरी)
- सौ. नेत्रा श्रीपाद वैद्य
- श्री. मोहित माणिक भेंडे
- सौ. प्रतिभा विश्वास तेंडुलकर
- श्रीमती अनुराधा अनिल तेंडुलकर
- श्री. राजेंद्र विनायक शिरगावकर
- श्री. अवधूत सी. सुखटणकर
- सौ. शुभांगी अ. सुखटणकर
- श्री. प्रसन्नराज शांताकुमार भांडारकर
- श्री. नागेश पिंगे
- श्री. अवधूत सदाशिव कोटणीस
- श्री. श्रीकांत सदाशिव सिनकर
- श्री. जगन्नाथ मनमोहन प्रभुदेसाई
- डॉ. श्रीरंग दामोदर बिचू
- श्रीमती विजया तेलंग
- श्री. दत्तप्रसाद मनोहर दळवी

## कुटुंबीय

- कै. नारायण झांट्ये यांचे कुटुंबीय
- कै. सौ. गीता गोपाळ पालेकर यांचे कुटुंबीय
- कै. डॉ. प्रभाकर वामन रेगे व कै. सौ. प्रमोदिनी प्रभाकर रेगे यांचे कुटुंबीय
- कै. नीला व रामकृष्ण अनंत सबनीस यांचे कुटुंबीय
- कै. व्ही. डी. पाडगावकर आणि पत्नी श्रीमती आशा
- कै. सौ. निर्मला गोविंद वाडेकर यांचे कुटुंबीय
- कै. सौ. सुलभा व कै. श्री. चंद्रकांत गणेश सुखटणकर यांचे कुटुंबीय
- स्ट्रक्टवेल डिझायनर्स अँड कन्सल्टंट्स संस्था मर्यादित (कै. रमेशचंद्र नारायण रायकर यांच्या स्मरणार्थ)
- प्रमिला दत्ताराम तेंडुलकर (वडील कै. डॉ. सगुण राघोबा रेगे यांच्या स्मरणार्थ)
- कै. श्रीमती साधना धुंडीराज वाकडे यांचे कुटुंबीय
- डॉ. राजीव गुरुनाथ रेडकर (आजोबा कै. आत्माराम श्रीधर रेडकर व आजी कै. नलिनी आत्माराम रेडकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ)
- कै. भास्करराव मोरेश्वर कामत यांचे कुटुंबीय
- डॉ. प्रभाकर नारायण कामत (कै. श्री. नारायण विश्वनाथ कामत व श्रीमती इंदिरा नारायण कामत यांच्या स्मरणार्थ)
- श्री. गजानन नारायण डांगी आणि कुटुंबीय
- श्रीमती वैशाली साखळकर (कै. श्रीनिवास भा. साखळकर यांचे स्मरणार्थ)
- कै. श्री. प्रभाकर शामराव कामत व कै. श्रीमती ललिता प्रभाकर कामत यांच्या स्मरणार्थ
- उर्मिला मधुकर चिटणीस (कै. श्री. मधुकर शंकर चिटणीस आणि सौ. गिरिजा मधुकर चिटणीस)
- सौ. अनुराधा उल्हास तेंडुलकर, पूर्वाश्रमीच्या कुमारी कुंदबाला मधुकर हेर्लेकर (वडील कै. मधुकर मोतीराम हेर्लेकर यांच्या स्मरणार्थ)
- क्षमा एस. पालेकर (श्रीराम गजानन पालेकर यांच्या स्मरणार्थ)

## संस्था

- सारस्वत हितवर्धक मंडळ, माहीम, मुंबई
- सारस्वत ब्राह्मण समाज, गिरगाव, मुंबई

# आश्रयदाते

**व्यक्ती**

- डॉ. राजेंद्र वाय. आंगले
- डॉ. प्रताप बा. मुळगांवकर
- श्री. गुरुनाथ शं. साखळकर
- श्री. शशिकांत ए. तेंडुलकर
- श्री. श्रीधर वामनराव सांखोळकर
- श्रीमती सुरेखा केशव पंडित
- श्रीमती कुमुदिनी इ. नाईक
- श्री. मुकुंद कृष्णाजी सबनीस
- सौ. मीरा व श्री. सीताराम लाड
- श्री. प्रमोद रघुनाथ वकील (नाईक)
- श्री. मोहनदास शानभाग
- श्री. प्रशांत वि. कामत
- डॉ. वामन चिं. पालेकर
- श्री. मिलिंद दिगंबर वरेरकर
- श्री. आत्माराम शांताराम पुनाळेकर
- श्री. भालचंद्र गंगाधर वाकडे
- श्री. व सौ. अनुराधा श्रीकृष्ण दळवी
- श्री. अरविंद यशवंत सबनीस
- सौ. सविता कमलाकर देसाई
- श्री. पुरुषोत्तम लक्ष्मण दळवी
- श्री. विनायक कुळकर्णी
- श्री. माधव वसंत देशपांडे
- श्री. राजाराम मंगेश सिनकर
- श्री. मोहन रामचंद्र देशपांडे
- सौ. सुनीला एम. रेगे
- श्रीमती रोहिणी कमलनाथ दिवाडकर
- श्री. विश्वनाथ आर. नेरूरकर
- डॉ. विवेक सुधाकर हळदवणेकर
- श्री. शशिधर यशवंत राजाध्यक्ष
- श्री. दामोदर मर्तू नायक
- डॉ. सुरेश वासुदेव दणाईत
- श्री. रमाकांत पां. लोटलीकर
- श्री. दिनकर जयवंत मंत्री
- कु. अनघा प्रणव तेंडुलकर
- डॉ. कल्पा अरविंद पंडित
- श्री. मनीष किशोर वाकडे
- डॉ. संजय लोटलीकर
- श्री. शैलेश लक्ष्मीकांत नेरुरकर
- श्री. संदेश सुरेश सरदार
- श्री. संजीव रामचंद्र तेंडुलकर
- श्री. रवींद्र कृष्णाजी कामत
- सौ. मंगल रमाकांत तेंडुलकर
- श्री. अशोक जनार्दन सिनकर
- ॲड. यशवंत जगन्नाथ कावतकर
- श्री. दिलीप सुंदरराव परुळकर
- श्रीमती निर्मला एन. खानोलकर
- श्री. सुधाकर अच्युत राजाध्यक्ष
- श्री. रमेशचंद्र रघुनाथ तेंडुलकर
- श्रीमती ऋजुता राजन तेरगावकर
- डॉ. करिश्मा प्रसाद बांदिवडेकर
- सौ. राधिका रामदास पत्की

- श्री. कल्याण वर्दे
- श्री. मोरेश्वर एम. वायंगणकर
- श्रीमती माधवी परेश घोलकर
- श्री. उमेश मे. भांगले
- श्री. मंगेश (राजा) दत्तात्रय हळदवणेकर
- श्री. प्रमोद विनायक कामत
- अँड. देवदत्त अजित साखळकर
- श्री. प्रसन्न मदन सिनकर
- श्री. मंगेश श्रीधर कामत
- श्री. सुचित सुधीर कावतकर
- श्री. दीपक यज्ञेश्वर मुळ्ये
- श्री. आनंद घुर्ये
- श्री. श्रीकांत श्रीराम तेंडुलकर
- श्री. गिरीश ज. महाडदळकर
- श्रीमती पुष्पलता माधव कोटणीस
- श्री. मधुकर हरी नारुरकर
- श्री. विवेक म. लोटलीकर
- श्री. दत्ताराम गोविंद कैसरे
- श्री. रमेश विठ्ठल कामत
- डॉ. यशस्विनी रजनीकांत जनवाडकर
- श्री. सिद्धार्थ लाटकर
- श्री. वामन सुभ्भा प्रभू
- सौ. पूर्णा उदय प्रभू पाटकर
- श्री. भास्कर के. दळवी
- श्री. अशोक केसरीनाथ नाडकर्णी
- श्री. एम. एन. कंटक
- श्री. चंद्रकांत विनायक देसाई
- डॉ. अरविंद दत्ताराम मांजरेकर
- श्रीमती श्रद्धा आशुतोष कुळकर्णी

### कुटुंबीय

- कै. डॉ. द्वारकानाथ वि. पंडित यांचे कुटुंबीय
- कै. व्ही. एन. व कै. डब्ल्यू. एस. परुळकर यांचे कुटुंबीय
- कै. सौ. आशालता चंद्रकांत सिनकर यांचे कुटुंबीय
- कै. सौ. काशीबाई ऊर्फ मीना नारायण राजाध्यक्ष यांचे कुटुंबीय
- कै. श्रीमती सुमन मधुकर देसाई यांचे कुटुंबीय
- कै. विश्वनाथ वामन नाडकर्णी व कै. सौ. अन्नपूर्णा वि. नाडकर्णी यांचे कुटुंबीय
- कै. एन. जी. कामत यांचे कुटुंबीय
- कै. एकनाथ व्यंकाजी रांगणेकर आणि पत्नी श्रीमती सुनीता
- कै. सौ. केतकी सुरेंद्र मंत्री यांचे कुटुंबीय
- कै. रमाकांत शेषगिरीराव कुळकर्णी यांचे कुटुंबीय
- कै. सौ. रमाबाई व वासुदेव रामचंद्र नाडकर्णी यांचे कुटुंबीय
- कै. गोपाळकृष्ण द्वारकानाथ गावसकर व कै. सौ. नीला गो. गावसकर यांचे कुटुंबीय
- कै. सौ. सुनंदा (छबी) राजाराम कबे यांचे कुटुंबीय
- कै. श्री. गिरीश शंकर गोठिवरेकर कुटुंबीय
- सौ. उज्वला व श्री. रत्नाकर रामकृष्ण वागळे आणि कुटुंबीय
- श्री. विनोद मधुकर गुळगुळे (पत्नी कै. सौ. विनिता (शैला) विनोद गुळगुळे हिच्या स्मरणार्थ)
- श्री. भालचंद्र सुभाष कामत (बंधू कै. विनायक सुभाष कामत यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ)
- श्री. गिरीश चंद्रकांत कळसूलकर (कै. सुनंदा व कै. बाळकृष्ण महादेव. कळसूलकर यांच्या स्मरणार्थ).
- श्री. विनायक गोविंद कामत (कै. गोविंद आनंदराव कामत यांच्या स्मरणार्थ)
- श्री. सुब्राय अच्युत गायतोंडे आणि कुटुंबीय
- श्री. भालचंद्र सुभाष कामत (कै. विनायक कामत यांच्या स्मरणार्थ)
- डॉ. मृणाल आणि डॉ. रघुनंदन गोविंद केंकरे तोरसेकर
- विवेक बाळकृष्ण तिनईकर (कै. अविनाश बाळकृष्ण तिनईकर यांच्या स्मरणार्थ)
- एन. एस. पै ॲण्ड सन्स, बेळगाव

### संस्था

- सारस्वत दीनवत्सल संघ, गिरगाव, मुंबई
- बारदेशकर गौड सारस्वत ब्राह्मण निधी, दादर, मुंबई

# अंतरंग


संपादकीय / ११

पूर्वीचा भूतकाळ / १२

॥धर्मो रक्षति रक्षितः॥ - मयुरेश पाडगांवकर / १३

सिंधुदुर्गचे माणिकमोती - तेर्से बांबर्डेचे संत

सीतारामबुवा वालावलकर - डॉ. बाळकृष्ण लळीत / २०

होमियोपॅथीची मूलभूत तत्त्वे - औषधनिर्मिती व

मात्रेची परिमाणे - डॉ. मंदार पाटकर / २३

काहीतरी ढासळलंय! / २७

दंतवैद्य हरिभाऊ विष्णू कित्तूर - अनुराधा तेंडुलकर / ३०

एक सत्य - अशोक नाडकर्णी / ३१

जागतिक मैत्री दिनाच्या निमित्ताने - एक होती 'ही', एक होती 'ती' / ३२

संस्था वृत्त - अनेक आठवणींची ग्रेट भेट -

श्रेयसी वझे - मंत्रवादी / ३४

भावांजली / ३६

उदयोन्मुख सारस्वत उद्योजक / ३८

सारस्वत कुटुंबातील मुलांनी दहावीच्या परीक्षेत मिळवले

देदीप्यमान यश! / ३९

कविता - नेत्रा वैद्य, किशोर रांगणेकर

**संपादकीय** I सुधाकर लोटलीकर



# एक पाऊल पुढे...

सारस्वत प्रकाशन, सारस्वत चेंबर आणि ऑल इंडिया सारस्वत कल्चरल ऑर्गनायझेशन या तीन संस्थांनी अलीकडेच म्हणजे ५ ऑगस्ट २०२३ रोजी तेंडुलकर मंगल कार्यालय येथे सर्व सारस्वत संस्था पदाधिकाऱ्यांची एक सभा आयोजित केली होती. आजही आपल्या समाजात नोकरी, विवाह जमवणे, वैद्यकीय तसेच अभियांत्रिकी यासारख्या उच्च शिक्षणासाठी मदतीची गरज अशा समस्या आहेतच. अशा उद्भवणाऱ्या विविध समस्या हाताळण्यात किंवा इतर बाबतीत सहकार्य करताना ज्ञातीतील सर्व संस्थांनी पोटभेद विसरून एकमेकांशी सहकार्य केले तर ते कार्य जास्त शिस्तीने व नेटाने होऊ शकेल. विस्कळीत पोटसंस्थांपेक्षा सुसंघटित संस्था जास्त कार्यक्षम असतात असा अनुभव वारंवार येतो.

सारस्वत समाजातील प्रत्येक ज्ञातिघटकातील निरनिराळ्या संस्थांचा निकटचा संबंध येऊन त्यातील कार्यकर्त्यांचा एकमेकांशी परिचय होणे इष्ट आणि आवश्यक आहे असे आम्हाला वाटते. एकवटून संघशक्तीने कार्य केले पाहिजे हे तत्त्व आता बहुतांशी ज्ञातिबांधवांनी आणि संस्थांनी गाठीशी बांधणे ही आमची नव्हे तर काळाची गरज आहे. याच विषयावर मी दिवाळी २०२० च्या अंकात एक लेख लिहिला होता. त्याचेच पुढचे पाऊल म्हणून या सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेला उत्तम प्रतिसाद मिळाला. मुंबईतील जवळपास सर्वच संस्थांचे पदाधिकारी या सभेला उपस्थित होते.

आपापल्या संस्थेचे कार्य, उपक्रम यांची माहिती देतानाच काही उपयुक्त सूचनाही सुचविण्यात आल्या. अशा संयुक्त सभा वारंवार व्हायला हव्यात आणि त्यातून काही समाजोपयोगी ठोस निर्णय होऊन उपयुक्त कार्य घडायला हवे असे अनेक संस्था पदाधिकाऱ्यांनी आम्हाला कळवले. तशी ही पहिलीच आणि प्राथमिक सभा होती. त्यामुळे त्या सभेत काही पक्का निर्णय होईल अशी अपेक्षाही नव्हती. त्यासाठी आपापसात कायम सुसंवाद राखला जाणे अत्यंत आवश्यक आहे. त्या दिशेने सुरुवात झाली आहे हेही नसे थोडके.

एकूणच ज्ञातिसंस्थानी बदललेल्या काळाशी सुसंगत विचार करण्यास सुरुवात केली आहे त्यामुळे विद्यमान समस्यांना संघटितपणे समाजबांधव सामोरे जाऊ शकतील अशी खात्री बाळगण्यास हरकत नसावी. ही सभा आयोजित करून वरील संस्थांनी एक पाऊल पुढे टाकले आहे. आता इतर संस्थांनी हे पाऊल पुढे पडत राहील याची दक्षता घेणे आवश्यक आहे. हा संस्था संवाद वाढवण्यात सातत्य राहिले तर निश्चितच काही फलप्राप्ती मिळू शकेल अशी आम्हाला खात्री वाटते.

## अनुकरणीय उपक्रम

सारस्वत प्रकाशन संस्थेने प्रकाशित केलेल्या 'सारस्वत परिचय' या ग्रंथाच्या १०० प्रती जीएसबी सभा, माटुंगा या संस्थेने विकत घेतल्या आहेत. त्यांच्या संस्थेतर्फे २० ऑगस्ट २०२३ रोजी झालेल्या शिष्यवृत्ती प्रदान सोहळ्यात हे ग्रंथ भेट देण्यात आले.

या ग्रंथात सारस्वत समाजातील आडनावे, गोत्र, ज्ञातिघटक, कुलदैवत- ठिकाण अशा क्रमवारीने दोन हजारांहून अधिक आडनावांचा समावेश असून सारस्वत ज्ञातीचे मठ, कुलदैवते याविषयीही माहिती देण्यात आली आहे.

या ग्रंथ वाचनामुळे नवीन पिढीला आपल्या ज्ञातीविषयी आवश्यक अशी महत्त्वाची माहिती होऊ शकेल. पुढील पिढीसाठी आपण "सारस्वत" म्हणजे नेमके कोण हे मनावर ठसवण्यासाठी अशी पुस्तके देणे ही कल्पना कौतुक करावी अशीच आहे. अनुकरणीय असा हा उपक्रम आहे.

# सर्व सारस्वत संस्थांनी एकत्र येणे, ही काळाची गरज!

सारस्वत प्रकाशन, सारस्वत चेंबर ऑफ कॉमर्स आणि ऑल इंडिया सारस्वत कल्चरल ऑर्गनायझेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबईतील काही सारस्वत संस्थांची एक संयुक्त सभा शनिवार, ५ ऑगस्ट २०२३ रोजी तेंडुलकर मंगल कार्यालय, माहीम येथे सायंकाळी ५ वाजता आयोजित करण्यात आली होती. सभेच्या अध्यक्षस्थानी सारस्वत प्रकाशनचे अध्यक्ष दिलीप भिसे होते. त्यांच्यासोबत सारस्वत चेंबरचे संचालक व सारस्वत हितवर्धक मंडळाचे अध्यक्ष सिद्धार्थ सिनकर, ऑल इंडिया सारस्वत कल्चरल ऑर्गनायझेशनचे अध्यक्ष अजित गुंजीकर आणि सारस्वत प्रकाशनचे विश्वस्त प्रमोद तेंडुलकर होते. सभेला सुरुवात करताना सारस्वत प्रकाशनचे संयुक्त कार्यवाह प्रसाद कुलकर्णी ह्यांनी उपस्थित संस्था पदाधिकाऱ्यांचे स्वागत केले. त्यानंतर सर्व सारस्वत संस्थांनी एकत्र येणे काळाची गरज असून आपल्या एकत्र येण्यामुळे आपण जातीयवादी आहोत असा समज होईल, अशी भीती बाळगण्याची गरज नाही, असे नमूद करून त्यांनी उपस्थित सर्व सभासदांना आपला परिचय करून देण्याची विनंती केली. सर्व सभासदांचा परिचय झाल्यानंतर सारस्वत चैतन्यचे माजी संपादक आणि सारस्वत प्रकाशनचे विश्वस्त प्रमोद तेंडुलकर यांनी सभेची संकल्पना मांडली. सभेची संकल्पना मांडताना प्रमोद तेंडुलकर म्हणाले, ‘आपण सर्व संस्थांचे पदाधिकारी विविध कार्यक्रमात एकत्र भेटतो; परंतु त्यावेळी समाजाच्या भवितव्यासंबंधी चर्चा होत नाही. म्हणून आज आपण या संयुक्त सभेचे आयोजन केले आहे. आपण एकत्र येऊन समाजाची गरज भागवली जाईल, अशी एखादी संकल्पना मांडून, एखादा प्रकल्प राबवू शकतो का, ह्यावर चर्चा करू. त्याचबरोबर आज कुठल्याही विषयावर अंतिम निर्णय न घेता आज चर्चा झालेले सर्व मुद्दे आपल्या संस्थेच्या व्यवस्थापक मंडळासमोर मांडून त्यांचे मत घेऊ. त्यामध्ये ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या, वृद्धाश्रम, बेडरिडन पेशंटच्या समस्या, आरोग्यविषयक समस्या व त्यावरील उपाय विचारात घेऊन काही प्रकल्प, काही उपक्रम राबवता येतील का, अशा प्रकारच्या काही विषयांवर चर्चा करू.’

त्यानंतर सारस्वत चेंबर्स ऑफ कॉमर्सचे संचालक सिद्धार्थ सिनकर पुढील संकल्पना मांडताना म्हणाले की, ‘सध्याच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदतीबरोबरच सॉफ्ट स्किल्सचे प्रशिक्षण देणे अत्यंत आवश्यक आहे. त्यानुसार ‘सॉफ्ट स्किल डेव्हलपमेंट अकॅडमी’ सुरू करावी. अशी शैक्षणिक मदत घेणाऱ्या विद्यार्थ्यांना हे शिक्षण सक्तीचे करावे. तसेच सर्व सारस्वतांचा डेटाबेस तयार करावा. या उद्देशावर सध्या सारस्वत चेंबर्स काम करत आहे, तरी प्राथमिक स्वरूपाचा मसुदा तयार झाल्यावर सर्व संस्थांची सभा घेण्यात येईल. या उपक्रमात सर्व संस्थांचा सहभाग आवश्यक आहे.’

अजित गुंजीकर यांनी ‘आयस्को’चे सर्व संस्थांशी असलेले संबंध यावर माहिती दिली. यावेळी बोलताना ते म्हणाले, ‘आजची ही सभा आपण जरी काही मर्यादांमुळे येथे घेत असलो, तरी आपल्याकडे ‘ई प्लॅटफॉर्म’ असता, तर आजच्या सभेचे निमंत्रण सर्वांना देता आले असते. याचाच विचार करून ‘व्हिजन’ (Vishwa Saraswat Integrated organization network) हा प्लॅटफॉर्म सुरू करण्याचे काम चालू असून पुढील ३ ते ४ महिन्यात प्राथमिक स्ट्रक्चर तयार होईल. हा स्ट्रक्चर सर्व संस्थांना आपली माहिती भरण्यासाठी उपलब्ध असेल.’

कॉर्पोरेट सेक्टरमध्ये उच्चपदावर असलेल्या सारस्वत व्यक्तींना एकत्र आणून त्यांच्याबरोबर सभा घ्यावी, असे सुनील रेगे यांनी सुचविले. तरुण वर्गाला आकर्षित करण्याकरिता प्रयत्न व्हावे, असे वामन नाडकर्णी यांनी सुचविले. सॉफ्ट स्किल डेव्हलपमेंट प्रोग्रॅम करताना प्रथम सारस्वत प्रशिक्षकांचा विचार व्हावा, असेही यावेळी मान्यवरांकडून सुचविण्यात आले. त्यानंतर मनीष दाभोळकर यांनी आपल्या संस्थेची माहिती दिली आणि युवकांना आकर्षित करण्याकरिता क्रीडा महोत्सव कसे भरविले जातात याबद्दल सांगितले. तसेच निराश्रित आणि असाहाय्य व्यक्तींसाठी काय करता येऊ शकेल याचा विचार व्हावा, त्याचबरोबर वधू-वर मेळाव्यासारखे कार्यक्रम संयुक्तरीत्या हाती घ्यावेत असेही सुचविले. जगदीश वालावलकर यांनी समस्त सारस्वत समाजाची जनगणना व्हावी, असे सुचविले, तर उदय (पान ४५ वर)





मयुरेश पाडगांवकर

# ।।धर्मो रक्षति रक्षितः।।

सारस्वत हितवर्धक मंडळातर्फे, शेफाली वैद्य या नामांकित लेखिका, वक्त्या, सोशल मिडियातील एक ज्वलंत विचार प्रवाह आणि हिंदू धर्म, देवळे व पौराणिक इतिहासाच्या आद्य अभ्यासक यांचे 'सारस्वतांची कुलदैवते आणि श्रद्धा' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. त्याचा थोडक्यात घेतलेला आढावा...

सारस्वत हितवर्धक मंडळातर्फे दिनांक १ मे २०२३ रोजी माहिम येथील मोगल लेनच्या तेंडुलकर हॉलमध्ये सारस्वत हितवर्धक मंडळातर्फे स्नेहमिलन सोहळा आयोजित करण्यात आला होता. शेफाली वैद्य या नामांकित लेखिका, वक्त्या, सोशल मिडियातील एक ज्वलंत विचार प्रवाह आणि हिंदू धर्म, देवळे व पौराणिक इतिहासाच्या आद्य अभ्यासक यांचे 'सारस्वतांची कुलदैवते आणि श्रद्धा' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते.

दीपक मुळ्ये यांनी कार्यक्रमाची आखणी उत्तम मांडली. परंपरेप्रमाणे सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन सारस्वत हितवर्धक मंडळातर्फे स्वागत करण्यात आले. सारस्वत विद्यावर्धक समाज (स्था.१८९१), सारस्वत सामाजिक समूह (स्था.१९०२), सारस्वत आत्मउन्नति समाज (स्था.१९०८) आणि सारस्वत हितवर्धक मंडळ (स्था.१९२४) या अनेक संस्थांबद्दल माहिती दिली दीपक मुळ्ये यांनी सारस्वत हितवर्धक मंडळाच्या ९९व्या वर्षातल्या पदार्पणाची व शतकी वाटचालीच्या मुहूर्ताची नांदी ४ नोव्हेंबर २०२३ रोजी बी.एन.वैद्य हॉल येथे होणाऱ्या विशेष कार्यक्रमाच्या घोषणेने व आमंत्रणाने केली.

राहुल साखळकर यांनी शेफाली वैद्य यांचा परिचय करून दिला. राष्ट्रवादाने प्रेरित गोव्याच्या कुंकळी गावातल्या वैद्य घराण्यातला जन्म आणि पिता प्रभाकर वैद्य या गोवामुक्ती संग्रामातील आघाडीचे स्वातंत्र्यसेनानी यांचं बाळकडू घेऊनच गोवा विद्यापिठाची राज्यशास्त्र व अर्थशास्त्र या विषयात पदवी प्राप्त केली. शेफाली यांनी पुणे विद्यापीठाच्या Mass Communication या विषयात Post Graduation केले.

मंदिर स्थापत्य, पालकत्व, गोव्याचा इतिहास, भारतीय वस्त्रकला, समकालीन राजकीय व सामाजिक परिस्थिती या विषयांवर त्यांचं लिखाण आहे. लेखन कलेबरोबर उत्तम



वक्त्यव्य ही त्यांची खास जमेची बाजू आणि म्हणून त्यांच्या व्याख्यानाला संपूर्ण तेंडुलकर हॉल श्रोत्यांनी बहरला होता. सोशल मिडियावर दहा लाख चालकांची पसंतीची पोचपावती मिळाली आहे. त्यांची 'घार हिंडते आकाशी', 'नित्य नुतन हिंडावे', 'चित्तरंगी रे' ही काही प्रसिद्ध झालेली पुस्तके. मुळ गोवेकर असलेल्या परंतु पुणे येथे स्थायिक असलेल्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाच्या शेफाली वैद्य यांचा सिद्धार्थ सिनकरांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सारस्वत हितवर्धक मंडळातर्फे सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरवही करण्यात आला.

व्याख्यानाची सुरुवात करताना सांगितलेली वैद्य कुटुंबियांची कथा शेफाली वैद्य यांच्या गोवा इतिहास, मंदिर स्थापत्य इतिहास आणि त्यातील त्यांचा अभ्यासूपणा यांची सूक्ष्म नाळ दर्शविते. शेफाली यांचा जन्म कारवारचा परंतु बालपण साऊथ गोवा येथील कुक्कळी या गावात गेले. वेर्णा या मूळ गावच्या वैद्य कुटुंबियांना कुक्कळी या गावी १७व्या शतकात स्थलांतरित व्हावे लागले होते. घराण्याची कुलदेवता म्हाळसा नारायणी. वेर्णा येथील म्हाळसा मंदिर पोर्तुगीजांनी पाडल्यामुळे वैद्य कुटुंबियांतील एक सदस्य धर्म वाचविण्यासाठी कुक्कळी या गावच्या आश्रयास आला. कुक्कळी हे गाव हिंदू राजाच्या राजवटीत असल्यामुळे वैद्य कुटुंबियांस स्थायिक होणे सुखकर झाले ते आजतागायत!

गोव्यातल्या सर्व भव्य मंदिरांच्या एकंदरीत रचना एकसुरी अनुभवल्यानंतर, हिंदू मंदिराची रचना अशीच असते हा समज, तांबडी सुर्ला येथील कदंबकालीन मंदिर न्याहाळल्यानंतर बदलला. हे मंदिर जंगलात असल्यामुळे पोर्तुगीजांच्या माऱ्यापासून बचावले आहे! गोव्यातील सारी मंदिरे घुमटाकार आहेत, परंतु तांबडी सुर्ला येथील मंदिरास शिखर आहे. शिखर असलेली मंदिरे उत्तर भारतात तसेच दक्षिण भारतात नजरेस पडतात. परंतु इतका स्वाभाविक फरक देवळाच्या रचनेत का असावा, याचं उत्तर शोधण्यासाठी शेफाली वैद्य यांनी केलेला इतिहासाचा व मंदिर स्थापत्याचा सखोल अभ्यास मनाला अचंबित करून जात होता. सखोल अभ्यासानंतर अवगत झालेले सत्य म्हणजे, गोव्यातील मंदिरांचा झालेला प्रचंड विनाश! आणि या विनाशामुळे विखुरला गेलेला सारस्वत समाज! पोर्तुगीजांच्या व तत्सम हिंदू व इतर राज्यकर्त्यांच्या अमानुष आणि धर्मभ्रष्ट कारवायांमुळे स्थलांतरित झालेला समाज म्हणजे सारस्वत समाज! हा समाज दक्षिणेस, उत्तरेस व महाराष्ट्रात किनारपट्टीलगत स्थापित झाला. परंतु इतकी शतके विखुरलेला हा समाज आजही कुलदेवतांवरील निस्सिम श्रद्धा व आस्था बाळगून आहे. म्हणूनच सर्व सारस्वतांना एकत्र जोडणारी एकमेव नाळ म्हणजे गोव्यात वसलेले कुलदेवतेचे मंदिर! लाखो सारस्वत कुटुंबे वर्षातून किमान एकदा गोव्याच्या मंदिरात जाऊन निष्ठेने पूजा, सेवा करतात व दर्शन घेतात.

याच मुळ मुद्द्याला अनुसरून आणि 'आपली धर्मभूमी गोवा' या तत्त्वावर मंदिराची पार्श्वभूमी शेफाली वैद्य यांनी आपल्या व्याख्यानात उत्कटतेने सादर केली. सारस्वत म्हणजे सरस्वती नदीच्या तीरावर वस्ती करून असलेली जमात! सरस्वती नदी आटायला लागल्यानंतर नदीची तळी बनू लागली. आजच्या काळातलं 'पुष्कर' हे तळं सरस्वती नदीचा भाग समजला जातो. सारस्वतांचा 'मासा' या अन्नप्रकाराचा व अन्नग्रहणाचा आलेला संबंध सरस्वती नदीकिनारी वास्तव्याचा समजला जातो. परशुरामांनी पृथ्वी दान केल्यानंतर, स्व-वास्तव्यासाठी भुतलावर बाण मारून सप्त कोकणची निर्मिती केली. हे सप्त-कोकण म्हणजे मुंबई किनारपट्टीपासून केरळपर्यंतची विखूरलेली किनारपट्टी. म्हणजेच भारताच्या पश्चिम किनारपट्टीचा इतिहास परशुरामनिर्मित सप्त कोकण इतिहास. याबद्दलचा असाही संदर्भ सापडतो की परशुरामांनी 'हरमल' येथील डोंगरावर एक यज्ञ केला. त्या डोंगराला आजही लोक 'भस्माचा डोंगर' म्हणून ओळखतात व त्या डोंगर मातीचा रंगही राखेप्रमाणे भासतो! ज्या जागेवर परशुरामांनी बाण मारला. तो प्रांत आज 'बाणावली' म्हणून ओळखला जातो.

परशुरामांनी जेव्हा यज्ञ केला तेव्हा त्यांना यज्ञासाठी ब्राह्मण-पुरोहित हवे होते. वेदशिक्षित पुरोहितांची गरज पुरवण्यासाठी परशुरामांनी 'ब्रिहोत' या गावाहून (बिहारमधील बिरुत) ब्राह्मण कुटुंबाना पाचारण केले. ९६ ब्राह्मण कुटुंब या यज्ञासाठी 'हरमल' येथे पोचली. इतिहासातील नोंद असे सांगते की ६६ कुटुंब आजच्या 'सालसेट' (सहासष्टी) या किनारपट्टी, तर ३० कुटुंब 'तिसवाडी' या ठिकाणी वसली. या पुरोहितांनी आपले देवदेवता सोबत आणले व या प्रदेशात कित्येक मंदिरे बांधली. व्यावसायिक व सहकार या विचारांची पुरोहित कुटुंबे गोव्यात 'ग्रामसंस्था' या रूपात बहरली आणि ग्रामसंस्थांनी धर्मसंस्कृती जपण्याचा वसा घेतला.

१५१० साली पोर्तुगीजांचे भारतात म्हणजे गोव्यात आगमन झाले. तोपर्यंत गोव्याच्या पावन भूमीत बहरलेली संस्कृती, धर्माची मंदिरे व ग्रामसंस्थांचा कारभार सुरळीत होत होता. आजच्या काळात 'फोंडा' परिसरात असलेली श्री शांतादुर्गा, श्री महालक्ष्मी, श्री नागेश, श्री रामनाथ, श्री कपिलेश्वरी इत्यादी मंदिरे त्या काळी सालसेट, बारदेस, तीसवाडी या प्रांतात स्थित होती. परंतु पोर्तुगीजांची अमानुष



॥ संहति: कार्यसाधिका ॥

# सारस्वत हितवर्धक मंडळ

सारस्वत भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग (मोगल लेन), माहीम, मुंबई-४०००१६

दूरध्वनी: 8828800727, Mail: shm1924@rediffmail.com | website:www.bhalavalikarsaraswat.org

## समाज बांधवांनी सर्वांगीण प्रगती साधून उत्तम आर्थिक स्थैर्य व सामाजिक प्रतिष्ठा मिळवावी अशा ध्येयाने प्रेरित १९२४ सालापासून कार्यरत असलेली भालावलीकर सारस्वतांची संस्था

## माहीममध्ये मध्यवर्ति, सोईस्कर जागी संस्थेची इमारत व ३०० माणसांयोग्य सुसज्ज एसी सभागृह




**इतर उपक्रम :**

- शिक्षण - आर्थिक, गणवेश व इतर साहित्याची मदत, विद्यार्थी शैक्षणिक मार्गदर्शन, शिक्षकांना प्रशिक्षण, शाळांना शिक्षण साहित्य, विद्यार्थी गुण-गौरव
- वैद्यकिय - आरोग्य, नेत्र तपासणी शिबिर, गरजू रुग्णांना अर्थसहाय्य
- असहाय्यांना आर्थिक मदत
- समाजातील कार्यशील, यशवंत व्यक्तिंचा सन्मान
- वधू-वर नोंदणी व मेळावा
- सामूहिक व्रतबंध
- मंडळाच्या कार्यक्षेत्रातील योग्य कार्याला कृतिशील प्रोत्साहन.



धर्म परिवर्तने व मंदिराचा विनाश चुकवून धर्मरक्षणासाठी सारस्वतांनी आपल्या मंदिरातील देवदेवतांच्या मूर्ती वाचविल्या व स्थलांतरित करण्यात यशस्वी झाले. बहुधा या कारणामुळे गोव्यातील काही सारस्वतांचे कुलदैवत कर्नाटक येथेही विस्थापित झालेले आहे.

गोवा प्रांताच्या इतिहासकालीन नोंदी असलेला तिसऱ्या शतकापासून ते १८व्या शतकापर्यंतचा इतिहास शेफाली वैद्य यांनी उलगडून दाखवला. यात राजा भोज, मौर्य, चाणक्य, शैलहरा, कदंब, विजयनगर, बहामनी, पोर्तुगीज, मराठे व अदिलशहा या राज्यकर्त्यांची राजवट थोडक्यात स्पष्ट केली. या अनुषंगाने त्या राजवटीत बांधलेली मंदिरे आणि पुढील हिंदू व इतर राजवटींनी केलेला विनाशही खूप प्रभावाने व्यक्त केला. त्याचबरोबर श्री सप्तकोटेश्वर, श्री दामोदर, श्री कामाक्षी या मंदिरांच्या स्थापने-प्रस्थापनेवरही प्रकाश टाकला गेला. पोर्तुगीज पूर्व काळातील मंदिरे व त्यांच्या रचना याबद्दलही दृकश्राव्य रुपात माहिती देण्यात आली. दगडी गुहेमध्ये स्थापन केलेली मंदिरे व त्याबद्दलची कथा श्रोत्यांना विशेष ज्ञान देऊन गेली. आजही गुहेतील मंदिरे नेत्रावळी, कोन्सुआ, खांडेपार, हरवेळ व रिवाना येथे पहावयास मिळतात. हरवळे येथील गुहेसदृश्य मंदिरात 'पंचलिंग' आजही नजरेस पडतात. याबद्दलचा इतिहास सांगताना शेफाली म्हणाल्या, शेकडो वर्षांपूर्वी गुहा फोडून व त्यांचा आकार मोठा करून त्यांचे मंदिरात रुपांतर करण्यात आले.

हे परिवर्तन पल्लवांनी तामिळनाडूत, राष्ट्रकुटांनी महाराष्ट्रात तर भोजांनी गोव्यात व गुप्तांनी बिहार, उत्तर प्रदेशात घडवून आणले. अशाच पद्धतीने मंदिरे अस्तित्वात आली. मंदिर बांधण्यास लागणारे साहित्य व विविध प्रकारचे दगड (काळा पाषाण, जांभा, इ.) याबद्दलही दिलेली माहिती ज्ञानात भर घालून गेली. कदंब राजवटींनी बांधलेल्या मंदिरासंबंधिचा इतिहास शेफाली यांनी प्रभाविरित्या व्यक्त केला.

पोर्तुगीजांनी विनाश केलेली ९०० मंदिरे व जाचक कायदा, जेणेकरून नवीन मंदिरे न बांधणे किंवा विनाश झालेल्या मंदिरांचा जिर्णोध्दार न करणे याबद्दल माहिती दिली गेली. पोर्तुगीजांनी गोवा काबीज करताना प्रथम सांगे, सालसेट, काणकोण असे तालुके आपल्या राजवटीखाली आणले. आजही गोव्याच्या इतिहासात या बाबींचा 'जुन्या काबिजादी' आणि 'नव्या काबिजादी' या नावे उल्लेख आढळतो. नवे तालुके जिंकण्यास पोर्तुगीजांना १०० ते १५० वर्षांचा कालखंड लागला. विशेषतः नव्या परगण्यांवर अधिकार प्राप्त करताना धार्मिक छळ तुलनेने कमी प्रमाणात झाला. याचं मुख्य कारण म्हणजे महाराष्ट्रातील मराठ्यांचा वचक व त्यांच्या शौर्याची पोर्तुगीजांनी घेतलेली धास्ती!

श्री छत्रपती शिवाजी महाराज, श्री संभाजी राजे यांची गोव्याच्या वेशीपर्यंतची घोडदौड व चिमाजी आप्पांनी वसईच्या लढ्यात पोर्तुगीजांचा केलेला निर्णायक पराभव, ह्याची पोर्तुगीजांनी घेतलेली धास्ती मराठ्यांच्या शक्तीची जाणीव करून देते. मंदिराच्या विनाशापासून गाभाऱ्यातल्या दैवतांच्या मूर्तीचं स्थलांतर कोणा एका सारस्वत कुटुंबाकडे दडवून राखण केलेली धर्मदेवता आणि कालांतराने नव्या भागात नव्या मंदिररचनेत स्थापत्य झालेली कुलदेवता या प्रवासाची गाथा शेफाली वैद्य यांनी अतिशय प्रभाविरित्या मांडली. या संपूर्ण 'धर्मरक्षा देवरक्षा' प्रक्रियेत कित्येक कुटुंबानी घेतलेले परिश्रम, जीवावरील बेतलेली संकटे, जोखिम आणि धर्म रक्षणासाठी केलेले अपार दान यांचाही त्यांनी विशेष उल्लेख केला. या कुटुंबांना मंदिर व्यवस्थापनाने आजही मानाचे स्थान दिलेले आहे.

१५व्या शतकातील अमानुष कृत्यांनी पोर्तुगीजांची चाललेली धर्मांतरे, अमर्याद अत्याचारांची वावटळ आणि अमानवी विनाशांनी उद्ध्वस्त झालेली धर्ममंदिरे यांचा एकत्रित परिणाम म्हणून सारस्वतांची कुलदैवत-कुलदेवता कोणा एका महाजनांच्या झोपडीवजा घरात वर्षानुवर्षे राखल्या गेल्या. १०० ते १५० वर्षांचा काळ लोटल्यानंतर जेव्हा पेशवाईचे राज्य आले, त्याकाळी सारस्वतांनी पेशव्यांची चाकरी पत्करली. काही सारस्वत दुभाषी, काही खजिनदार, सरदार, सैनिक इत्यादी अतिमहत्त्वाच्या पदांवर विराजमान झाले. जेव्हा गोव्यामधील सारस्वतांच्या हाती पेशव्यांच्या उच्चपदी चाकरीनिमित्त आर्थिक सुबत्ता आली, तेव्हा सर्वप्रथम या सारस्वतांनी गोव्यात जमिनी विकत घेतल्या आणि आज ज्या मंदिरात आपण मनोभावे पूजा अर्चा, अभिषेक, रुद्र करतो ती मंदिरे अस्तित्वात आणली.

इ. स. १५४० ते १५९० या काळात गोव्याचे तत्कालीन व्हॉईसरॉय व ज्येजुईट पंथांचे दोन पाद्री या त्रिकुटांनी गोव्यातील हिंदूंचा अमानवी छळ करून सारस्वतांना सर्वप्रथम जेरीस आणले. '२५ दिवसांच्या मुदतीवर धर्मांतर करा किंवा घर-दार सोडून चालते व्हा नाहीतर मरण पत्करा.' या फतव्याद्वारे संपूर्ण गोवेकरांच्या पिळवणुकीला सुरुवात झाली. याचा परिणाम म्हणून धर्म रक्षणासाठी आयुष्यभराची कमाई, पूर्वजांच्या वास्तु, जमिनी आणि सर्व नाती, सगेसोयरे सोडून सारस्वतांनी इतर प्रदेशी स्थलांतर पत्करले. १९९०च्या दशकात घडलेल्या काश्मिर अत्याचारांचे स्वरुप पोर्तुगीज इतिहासात कसे उपस्थित होते याचाही संदर्भ दिला गेला. गोव्याहून स्थलांतरीत

सारस्वत
ब्राह्मण समाज

# सारस्वत ब्राह्मण समाज

(स्थापना गुढीपाडवा १८९६)

(सार्वजनिक विश्वस्त नोंदणी क्र. ई-२२१४८ मुंबई)

मधुकोष, पहिला मजला, शं. वि. सोवनी पथ,
गिरगाव, मुंबई-४००००४.
दूरध्वनी : ०२२-२३८६२२६९
Email : saraswatbrahmansamaj@gmail.com

## संस्थेचे उपक्रम

सोमवार ते शुक्रवार, सकाळी १० ते १२ शिशुमंदिर

सोमवार ते शनिवार, दुपारी १२ ते ४ फॅशन डिझायनिंग

सायंकाळी ६ ते ८.३० वाचनालय

सायंकाळी ६ ते ८.३० वधूवर सूचक मंडळ

सोमवार, बुधवार व शनिवार सायंकाळी ५.३० ते ९ बॉलीवूड नृत्यकलेचे वर्ग.

मंगळवार व गुरुवार ५.३० ते ९ कथ्थक नृत्यकलेचे वर्ग

दुपारी ४ ते ५.३० योगविद्या

दर बुधवारी रात्री ९.३० ते १०.३० उपासना

झालेले सारस्वत तळकोकण, कोची व केरळ या भागात विखुरले गेले. कुडाळ येथे स्थलांतरित झालेले सारस्वत कुडाळदेशकर, भालावली येथे विस्थापित झालेले सारस्वत भालावलीकर इत्यादी नावांनी संबोधले जाऊ लागले. आपला गाव, जमीन, कुळ, नातलग यांचा त्याग करून धर्मरक्षणासाठी स्थलांतरित झालेल्या सारस्वतांच्या कहाण्यांची नोंद नसल्यामुळे त्यांनी घेतलेल्या कष्टाबद्दल इतिहासात संदर्भ सापडत नाही!

शेफाली वैद्य यांच्या उत्तम वक्तव्य कलेने मंत्रमुग्ध झालेल्या प्रेक्षकांसाठी धर्माच्या इतिहासाबद्दलची सत्य कथा आणि मंदिराचा विनाश ते नवस्थापत्य प्रवासांची कहाणी ही पर्वणीच होती. या सर्व व्याख्यानमालेतील उच्चबिंदू ठरला तो म्हणजे सारस्वतांनी दाखविलेली उच्चप्रतीची धर्मरक्षण वृत्ती, प्रचंड सहनशक्ती, अमर्याद अन्याय होऊनही धर्म, मंदिरे प्रस्थापनेसाठीची दानशुरता आणि कुलदेवतेवरील अपरंपार श्रद्धा व निष्ठा. व्याख्यानाच्या उत्तरार्धात झालेल्या प्रश्नोत्तराच्या विभागातही शेफाली वैद्य यांनी प्रत्येक शंकेचे व प्रश्नांचे अत्यंत सुजाण निरसन केले.

या कार्यक्रमास अनेक दिग्गज सारस्वत, ज्येष्ठ सहकारी उपस्थित होतेच परंतु विशेष उल्लेख म्हणजे मुंबईच्या माजी महापौर निर्मला सामंत-प्रभावळकर आणि सारस्वत बँकेचे माजी अध्यक्ष, संचालक व चिकित्सक समूहाचे अध्यक्ष किशोर रांगणेकर यांची विशेष उपस्थिती. कार्यक्रमाच्या अंतिम सत्रात सिद्धार्थ सिनकर यांनी सारस्वत हितवर्धक मंडळाचा प्रवास दृकश्राव्य माध्यमात अत्यंत प्रभावीरित्या सादर केला. त्याचबरोबर त्यांनी सारस्वत चेंबर्सचे विशेष महत्त्व, व्यापार, उद्दीष्ट आणि भविष्यातील सारस्वत उद्योजकांसाठी असलेल्या 'मार्केट प्लेस'बद्दल उत्तम माहिती दिली. सर्व आमंत्रितांच्या आणि श्रोत्यांच्या स्नेहभोजनाने या खुमासदार व वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रमाची सांगता झाली.

शेफाली वैद्य यांच्या वाणीतून उच्चारलेल्या धर्मरक्षणाच्या कथा व त्यांच्या एकंदरीत धर्माभिमानाची अनुभूती त्यांच्या विचारमंथनात जाणवत होती.




मातृभूमी 'गोवा' या विषयीचा नाजूक गाभा, गोव्यातील सारस्वतांनी रचलेल्या प्रचंड शौर्याच्या, निष्ठेच्या आणि त्यागाच्या प्रवासाची धुंदी मनात पूर्णतः उतरली होती. पोर्तुगीजांच्या पाशवी छळाच्या वेदना तर होत्याच, परंतु अभिमानाने मान उंच व्हावी अशा देवतांच्या रक्षणाच्या आणि मंदिर प्रस्थापनेच्या सुखद, अल्हाददायक आणि गर्वाच्या लहरीही होत्या. असा हा संमिश्र अनुभवाचा आलाप तेंडुलकर हॉलची मैफिल रंगवत होता. कोकण किनारपट्टीहून कोची बंदरापर्यंत स्थलांतरीत झालेली सारस्वत कुटुंबे आज सातासमुद्रापलीकडे वसलेली आहेत. काहींचे नातेसंबंध गोव्यात असतीलही परंतु कोणतेही नातेमंडळी, मित्रमंडळी गोव्यात नसतानाही सर्व सारस्वतांची नाळ जोडणारा एकमेव दुवा म्हणजे गोव्यामधील सारस्वतांच्या कुलदैवतांची मंदिरे.

वर्षातून एकदा का होईना गोव्याच्या मंदिरात यथायोग्य दर्शन, वास्तव्य, अभिषेक, व्रत इत्यादी परंपरा पाळण्यात सारस्वत कटिबद्ध आहेत, ते केवळ धर्माच्या, कुलदेवाच्या निष्ठेने आणि अपरंपार श्रद्धेने.

बहुधा याचकारणी म्हटले जात असावे.

॥धर्मो रक्षति रक्षितः॥

*****

*लेखक एका नामांकित कंपनीत चीफ ऑपरेटिंग ऑफिसर असून अभिनय, नाट्यलेखन, दिग्दर्शन, निवेदन आणि मुलाखतकार म्हणूनही कार्यरत आहेत.*

*भ्रमणध्वनी : ९०२९०४९८५८*

**आवाहन**

'सारस्वत चैतन्य'चे देणगीदार, जाहिरातदार आहेत अशांनीच वयाची पंचाहत्तर, ऐंशी वर्षे पूर्ण झाल्यावर कौटुंबिक अभीष्टचिंतन सोहळ्याचा फोटो पाठवल्यास त्यास जागेच्या उपलब्धतेनुसार विनाशुल्क प्रसिद्धी दिली जाईल. लग्न, मुंज यांचे फोटो छापले जात नाहीत. (जाहिरात शुल्कात सवलत देऊन छापले जातील.)

**- संपादक**

**आवाहन**

सारस्वत चैतन्यकडे मजकूर पाठविताना तो टाईप करून पीडीएफ व वर्ड फाईलमध्येच आणि Chaitanyamag@gmail.com या मेलवरच पाठविणे.

**- संपादक**

# सारस्वत दीनवत्सल संघ, मुंबई

**स्थापना : विजयादशमी, शके १८३०, ता. ५ ऑक्टोबर १९०८**

**रजिस्टर्ड : ३.९.१९३६.** (No. 834 of 1936-37 under the Societies Registration Act, 1860)
**२०.९.१९५२.** (No. A-443 under the Bombay Public Trusts Act, 1950)

## विनम्र आवाहन

# निराधार, गरजूंचा आधार!

गेली ११४ वर्षे 'सारस्वत दीनवत्सल संघ' ही संस्था अखंडितपणे सारस्वत समाजातील सर्व ज्ञातीघटकांतील आजारी, वृद्ध, अपंग अशा गरजवंत बंधू भगिनींची सेवा करत आहे.

आज संपूर्ण जगावर आलेल्या संकटकाळात संस्थेला दानशूर व्यक्तींकडून मिळणाऱ्या देणगींचा ओघ कमी झाला आहे. बँकांच्या व्याजदरातही कपात झाली असल्याने परिणामी मदत असूनही आवश्यक तेवढी मदत गरजवंतांपर्यंत पोहोचवण्यात मर्यादा येत आहेत. तरीही अव्याहतपणे संस्थेने हे कार्य सुरूच ठेवले आहे.

अशावेळी पितृपक्षानिमित्त, दिवाळीची भेट म्हणून आपल्या कुटुंबातील वाढदिवसाप्रीत्यर्थ किंवा पूर्वजांच्या स्मरणार्थ उदार हस्ते देणगी देऊन या देवकार्यात आपणही सहभागी व्हावे.

आपण सर्व सारस्वत सरस्वतीचे उपासक आहोत. आपण घेणारे नाही, देणारे आहोत. सुज्ञ आहोत, सामाजिक बांधिलकीचे जतन करणारे, दानत असलेले भारतीय नागरिक आहोत. हिंदू संस्कृतीनुसार दानकर्माचे महत्त्वही जाणणारे आहोत.

शतक पार केलेल्या संस्थेच्या जडणघडणीत समाजातील अनेक निःस्पृह कार्यकर्त्यांचे योगदान आहे. घरोघरी जाऊन दिवाळी भेट म्हणून देणगी जमविण्याची परंपरा या संस्थेची आहे. आता बदलत्या परिस्थितीत हे अशक्य आहे, हे आपणास ज्ञात आहेच. म्हणूनच नवीन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आपल्याशी संस्थेचे कार्यकारी मंडळ संवाद साधत आहे.

आपला प्रतिसाद नक्कीच मिळेल, अशी आम्हाला खात्री आहे. 'एकमेका साहाय्य करू, अवघेचि धरू सुपंथ' या पंक्तीनुसार पुण्य व समाधान प्राप्त करण्याची ही संधी आहे, असे आपण मानूया.

आमच्या कार्याविषयी अधिक माहितीसाठी, देणगी देण्यासाठी किंवा गरजूला दिल्या जाणाऱ्या मदतीविषयी चौकशी करण्यासाठी खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

फोन क्रमांक : ०२२-२३८९ ८९९

(संध्याकाळी ६ ते रात्री ८)

पत्ता : मधुकोष, सारस्वत बँक बिल्डिंग, पहिला मजला, एस. व्ही. सोवनी पथ, गिरगाव मुंबई ४००००४

इमेल : saraswatdinvatsalsangh@gmail.com
वेबसाईट : www.dinvatsal.org

**– कार्यकारी मंडळ**
**सारस्वत दीनवत्सल संस्था**



## सिंधुदुर्गचे माणिकमोती... तेर्से बांबर्डेचे

# संत सीतारामबुवा वालावलकर

डॉ. बाळकृष्ण लळीत

बांबर्डे! मालवणी मुलखातील एक निसर्गरम्य, सदाहरित गाव. अगदी चित्रात असते तसे! या गावाच्या मागे तेर्से हे आडनाव कसे चिकटले? याचा सविस्तर आढावा घेणारा हा लेख...

बांबर्डे! कुडाळहून सावंतवाडीला जाताना पिंगुळीनंतर बिबवणे गावानंतर तेर्से बांबर्डे गाव लागते. मालवणी मुलखातील एक निसर्गरम्य, सदाहरित गाव. अगदी चित्रात असते तसे! या गावाच्या मागे तेर्से हे आडनाव कसे चिकटले?

लोकमानस सांगते. एक अद्भुत दंतकथा! ती अशी- पूर्वी जेव्हा कधी शेकडो वर्षांपूर्वी येथे वस्ती झाली, तेव्हा ती टिकतच नव्हती. एक तर घराणीच संपत किंवा परागंदा होत. गाववस्ती नष्ट होण्याच्या मार्गावर असताना 'तेरसे' आडनावाचे एक घराणे इथे आले व वस्ती करून राहिले नि एकदा चमत्कार व्हावा तसे झाले. गाव पुन्हा मुलामाणसांनी, गुराढोरांनी गजबजला. जागा होऊ लागला. हे सारे त्या 'तेरसे' आडनावाच्या घराण्याचा पायगुणामुळे असे तेव्हाच्या लोकांना वाटले. म्हणून आपल्या मूळ 'बांबर्डे' गावाची ओळख सांगताना लोक सांगू लागले.



संत सीतारामबुवा वालावलकर

'खयचे तुमी..?' तर....

'तेरश्यांच्या बांबर्ड्यांचे!'

हळूहळू नामांतर झाले तेरसे. 'तेर्से-बांबर्डे'...!

श्री देव रामेश्वर, विठ्ठल, दत्त कुलदेवता अशी अनेक मंदिरे गावात आहेत. परबवाडी, गावडेवाडी, बारदेशकरवाडी, काजराळ, आंबेडकरनगर अशा एकूण बारा वाड्या आहेत. आणि हमरस्त्याला लागून आहे, 'मळावाडी'.

या मळावाडीत आहे वालावलकर कुटुंबियांचे घर! भातशेती आणि आंबा-फणस हे प्रमुख उत्पन्नाचे साधन, सध्या संतोष महादेव डिचोलकर हे सरपंच आहेत. त्यांना संपर्क केला नि या गावात जन्मलेल्या एका महान संत-महात्म्याची ओळख करून दिली.

ते म्हणाले, "डेरवणच्या सीताराम बुवा वालावलकर ट्रस्टने जर महाराजांच्या जन्मभूमीसाठी काही उपक्रम केले, तर आम्ही संपूर्ण साथ देऊ!"

योगायोग असा की, हे बोलत असताना ते नेमके माऊलींच्या आळंदीत होते. आळंदी-पंढरपूर वारीत सहभागी होते. वारकरी संप्रदायातील एका सरपंचपदी असलेल्या व्यक्तीबद्दल आदर द्विगुणित झाला. त्यांना शुभेच्छा दिल्या.

संत सीतारामबुवा वालावलकर यांचा जन्म याच तेरसे बांबर्डे गावात १८९९ साली गरीब सामान्य कुटुंबात झाला. त्यांना लहानपणीच ईश्वरभक्तीची आवड निर्माण झाली. शिवाय श्रीराम किंवा शिवशंकराचे अखंड नामस्मरण करीत गावातील मित्रमंडळी एकत्र जमवून मंदिरात ते नित्य भजनेही करीत. पुढे चरितार्थासाठी आठ-नऊ वर्षे त्यांनी मुंबईत गिरण्या-कापड दुकान यामधून नोकरी केली. परंतु भौतिक जीवनाचा तिटकारा व अंतर्मनातील वैराग्याच्या लहरी यामुळे दाभोळ-चिपळूण नजिकच्या कोंडमळा या ठिकाणी हनुमान मंदिरात त्यांनी वास्तव्य केले. पुढे सावर्डे येथील दत्तमंदिरात समर्थ स्वामींचे परमभक्त दिगंबरदास वहाळकर यांच्याबरोबर शेंबेकरबुवांना गुरुस्थानी मानून त्यांची सेवा सुरू केली. आध्यात्मिक शिकवणुकीसाठी त्यांनी पंढरपूर, अक्कलकोट, गाणगापूर इत्यादी ठिकाणी तीर्थयात्रा केली. पुढे साईखेडा, चित्रकूट येथून बनारस, गया, वैजनाथ ज्योतिर्लिंगादी ठिकाणी दर्शन घेऊन व समर्थांचा आशीर्वाद घेऊन आल्यामुळे त्यांच्या जीवनात अद्भुत क्रांती झाली. त्यांच्या ठिकाणी संतत्वाचे तेज प्रकाशू लागले. १९५१साली पूज्य दिगंबरबाबांचे महानिर्वाण झाल्यावर त्यांनी आपल्या गुरूंची समाधी बांधून तेथे मठस्थापना केली. समाधी दत्तमंदिरापासून एक मैलावर असलेल्या डेरवण येथे आहे. स्वर्गीय कमलाकरपंत वालावलकर यांचे




॥ न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ॥

# बारदेशकर गौड सारस्वत ब्राह्मण निधी

स्थापना : दि. ७ जून १९१४

नोंदणी क्र. एफ ८ (मुंबई) दि. ३०-१२-१९५२

## बारदेशकर गौड सारस्वत ब्राह्मण ज्ञातीतील एकमेव सामाजिक संस्था

- १०८ वर्षांची ज्ञातीतील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदतीची परंपरा
- आतापर्यंत २५०० हून अधिक विद्यार्थ्यांना ₹. २०,००,००० हून अधिक मदत
- बक्षीसपात्र विद्यार्थ्यांना भरघोस पारितोषिके
- गरीब, निराधार, वरिष्ठ नागरिकांना पेन्शनसदृश मासिक आर्थिक मदत
- इस्पितळात येणाऱ्या खर्चाकरिता गरजू ज्ञातीबांधवांना मदत
- वैद्यकीय मदत
- बारदेशकर ज्ञातीतील असामान्य मान्यवरांना पुरस्कार





## आगामी योजना

- वसतिगृहात राहून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विशेष आर्थिक मदत
- परदेशी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अंशतः मदत







## विशेष

- १९०० हून अधिक सभासद
- सभासदत्व सर्व ज्ञातीबांधव/ भगिनींसाठी खुले.
- निधीच्या विविध उपक्रमांसाठी देणग्या स्वीकारार्ह.

पत्ता : २, राजाराम निवास, प्लॉट नं. १७७, सर भालचंद्र मार्ग, हिंदू कॉलनी, दादर (पू.), मुंबई - ४०००१४.
ई-मेल: bardeshkar@gmail.com | website - www.bardeshkargsbnidhi.com



गुरू स्वर्गीय विठ्ठलराव जोशी आणि सीतारामबुवा यांचा १९५१पासून स्नेह होता.

संत सीतारामबुवा वालावलकर सहा फुट उंचीचे व सुदृढ होते. ते नेहमीच कष्टाची कामे करत. शेती स्वतः करत, दगड फोडणे, बांध घालणे अशी अंगमेहनतीची कामे करत. भारतभर फिरताना अनेक सिद्धयोगींची भेट त्यांनी घेतली. सद्गुरू वहाळकरबुवांचे १९५१मध्ये निर्वाण झाल्यावर सीताराम बुवांनी कश्यपी तिरावर त्यांची समाधी बांधून मठही बांधला. गुरू जोशीबुवांनी १९५८मध्ये सीतारामबुवा सेवा मंडळाची स्थापना केली व बापूसाहेब राजेशिर्के या श्रीमंत गृहस्थांनी एक जमीन विकत घेऊन दिली. त्या ठिकाणी १९६१साली सीतारामबुवांसाठी निवासस्थान बांधून पुढे त्यांचे समाधीमंदिर बांधले. या ठिकाणी माघ शु॥ प्रतिपदेस त्यांचा निर्वाणदिन साजरा केला जातो. समाधी मंदिरानजिक हनुमान मंदिर असून सीतारामबुवा जेथे तपश्चर्या करीत तेथे तीन औदुंबर उभे आहेत.

आपले गुरू संत दिगंबरदास व सीतारामबुवा यांच्या आदर्शान्वये कमलाकरपंतांनी १९५८साली 'संत सीतारामबुवा वालावलकर ट्रस्ट'ची स्थापना करून चिपळूण जवळ डेरवण येथे आधुनिक पद्धतीचे हॉस्पिटल सुरू केले. या अत्याधुनिक दवाखान्यात कर्करोगासहित सर्व आजारांवर उपचार अगदी अल्पदरात केले जातात. त्यामुळे कोकणातील हजारो रुग्णांना हा एक आधार वाटतो. कारण गरिबीमुळे त्यांना मुंबईत जाता येत नाही. अन्य उपचार, प्रशिक्षण, अभ्यासक्रमही येथे शिकवले जातात. या विश्वस्त संस्थेने जवळच डेरवणमध्ये उभी केलेली श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावरील आधारित शिल्पमाला पाहण्यासाठी दररोज हजारो पर्यटक येतात. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर प्रसंग शिल्परूपात साकारले आहे. एका थोर संस्कृतीचे चित्ररूप दर्शन येथे पाहायला मिळते. शिल्पकार दादा पाटकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी विविध रंगातील ही शिल्पसृष्टी तयार केली. ती पाहताना आपण क्षणात शिवकाळात जातो.

'राष्ट्र, देव, धर्म' या विषयी आपले कर्तव्य कोणते? याची जाणीव ही शिल्पसृष्टी पाहताना होते. अनेक संत, शूर मावळे, सरदार, गोमाता मंदिर हे सारे पाहताना आपण थक्क होतो. या परिसराला 'शिवसमर्थगड' असे नाव आहे. हे सारे वातावरण, परिसर आपण अवश्य पाहा असे मी सुचवेन. हे सर्व उभे राहिले त्याला कारण सीताराममहाराज यांची प्रेरणा आहे. ट्रस्टने जनतेसाठी पिण्याच्या पाण्याची उत्तम सोय येथे केली असून कुपनलिका, गरिबांना घरबांधणीस मदत, शिक्षण, विनामूल्य दवाखाना सुरू केला. शिवाय परिसरातील गरजूंना विवाहासाठी मदत, शेतकरी बांधवांना मोफत गाई, गुरे, वासरे दिली जातात. उद्यान देवालयाचा जिर्णोद्धार अशी कार्ये केली आहेत. या ट्रस्टने त्यांच्या जन्मगावी तेर्से बांबर्डे येथेही असेच कार्य सुरू केले पाहिजे. १८ जानेवारी १९६९ रोजी सीतारामबुवांचे निधन झाले.

मुंबई सोडून सीतारामबुबांनी व नंतर कुटुंबियांनी अनेकांच्या सहकार्याने या परिसराचा आपल्या पद्धतीने कायापालट केला. मुंबईतून येऊन केलेले अलौकिक कार्य आहे. अर्थात पुढे यात कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर यांचा व प्रमुख विश्वस्थांचा वाटा महत्त्वाचा आहे. गुरूसेवा, परमार्थचिंतन, ईश्वरभक्ती करत असताना त्यांना औषधांची माहिती असल्याने आरोग्यसेवाही ते त्या काळीही करत.

एक समर्पित जीवन जगलेल्या आपल्या या सिंधुरत्नांची आठवण आपण सदैव ठेवायला हवी. या स्थळाला भेट द्यायला हवी. ही संस्था आता संत सीताराम बुवांच्या जन्मगावी त्यांची स्मृती जागवेल अशी अपेक्षा करू या.

संदर्भ -


१. आजगावकर गुं.फ., कुडाळदेशकर समग्र इतिहास, नवी आ.२००४, पृ. २५५.

२. विशेष सहकार्य - मा.नितीन गोलटकर, मा. संतोष डिचोलकर.


***


*लेखक हे पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यात असणाऱ्या चां. ता. महाविद्यालयात मराठी विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहेत.*

मोबाईल -९६६५९९६२६०



डॉ. मंदार पाटकर

# होमियोपॅथीची मूलभूत तत्त्वे

## औषधनिर्मिती व मात्रेची परिमाणे

आजकाल बरीच प्रचलित असणारी उपचार पद्धती म्हणजे होमियोपॅथी. होमियोपॅथीची मूलभूत तत्त्वे आणि औषधसिद्धतेच्या प्रक्रियेबद्दल विस्ताराने चर्चा करणारा सर्वांसाठीच अत्यंत उपयुक्त लेख.

होमियोपॅथीमध्ये सर्व औषधे ही संपूर्णपणे नैसर्गिक तत्त्वांपासून बनलेली असतात. निसर्गामध्ये औषधी गुणधर्म असलेल्या अनेक गोष्टींपासून होमियोपॅथीची औषधे बनतात. वनस्पतींपासून बनलेली / वनस्पतीजन्य (Plant kingdom) प्राण्यांच्यापासून बनलेली / प्राणिजन्य (Animal Kingdom) उदा.सापाच्या विषापासून, गाईच्या दुधापासून इत्यादी प्राणिजन्य स्त्रोतांपासून होमियोपॅथीमध्ये औषधे बनतात. पृथ्वीच्या पोटातील विविध खनिजांपासून खनिजजन्य (Mineral Kingdom) या सर्व औषधी वस्तूंवर होमियोपॅथीमध्ये एक शास्त्रशुद्ध रित्या एक प्रक्रिया केली जाते. तिलाच औषध निर्मिती व मात्रेचे परीमाण (Doctrine of Drug Dynamization) असे म्हटले जाते.

होमियोपॅथीक डायनामायझेशन प्रक्रिया ही अतिशय महत्त्वपूर्ण प्रक्रिया आहे. ज्यात नैसर्गिक पदार्थांमधील औषधी तत्त्वे वर आणली जातात व ती वाढवली जातात. उदा. जसे आपण वर पाहिले की प्राणीजन्य पदार्थांमध्ये सापाचे विष हे देखील असते. वर या विषामध्ये आणखी अनेक औषधी तत्त्वे असतात जी शरीराच्या अनेक असाध्य व्याधींवर परिणामकारकरित्या कार्य करून त्या व्याधी नष्ट करू



शकतात. परंतु जर हे सापाचे विष असेच म्हणजेच काहीही प्रक्रिया न करता जर माणसाला दिले तर त्यामुळे विषाचा विपरीत परिणाम होईल. म्हणूनच हे Drug Dynamization केले जाते. ज्यात औषध पदार्थातील विषारी गुणधर्म काढून टाकून त्याचे उपकारी गुणधर्म वाढवले जातात व त्यानंतर त्या बनलेल्या औषधांची विविध शक्ती(power) मध्ये निर्मिती केली जाते; या शक्ती वाढविण्याच्या प्रयोगाला (Potentisation) असे म्हणतात.

पोटेंटायझेशन औषधाची शक्ती वाढविण्याची प्रक्रिया. औषधांची मात्रा ही बाहेरून ऊर्जेचा दाब देऊन त्यातील संभाव्य ऊर्जा म्हणजे Potential Energy ही वाढवली जाते. औषधांच्या बनलेल्या मात्रेला ऊर्जा दिल्यामुळे त्यातील अणूंमध्ये असलेली स्थिर ऊर्जा (Static Energy) ही उद्दीपित होते. अणू व रेणू यांची हालचाल वाढून संभाव्य ऊर्जा वाढीस लागते या ऊर्जा वाढविण्याच्या प्रक्रियेलाच पोटेंटायझेशन असे म्हणतात. दोन प्रकारे ही क्रिया करता येते.

**१. विघटन पद्धत (Trituration)** - जेव्हा औषधी पदार्थ हा न विरघळणारा असतो तेव्हा विघटन पद्धतीने त्यातील औषधी गुणधर्म वाढवले जातात.

**२. सक्शन** – या प्रक्रियेत विरघळणारे पदार्थ हे वापरले जातात. या प्रक्रियांमध्ये रुग्णाला औषधांचे दुष्परिणाम होऊ नयेत अशा मात्रेत औषधी बनवली जातात. म्हणूनच शास्त्रशुद्ध होमियोपॅथीचा रुग्णांवर कोणताही परिमाण होत नाही उलट परिणाम अतिशय सकारात्मक होतो. तसेच होमियोपॅथीच्या तत्त्वांप्रमाणे चैतन्य शक्तीला बळ देण्यासाठी औषधेही तशीच गतिशील असावी लागतात. (Dynamie in nature) त्यामुळे इतर औषध शास्त्रांप्रमाणे मोठमोठ्या गोळ्या न देता लहान गोड गोळ्यांमधून औषध दिले जाते जे अतिशय शक्तीशाली असते. काही औषधे ही त्यांच्या मूळ रूपात असताना औषधी गुणधर्म दाखवत



नाहीत. परंतु त्यांच्यावर शास्त्रशुद्ध प्रक्रिया केल्यावर मात्र ही औषधे त्यांचे औषधी गुणधर्म दाखवतात. या पोटेंटायझेशन नंतर औषधांची Active म्हणजेच परिणाम हे फार खोलवर जाऊन होतात. औषधाचे परिणाम खूप काळपर्यंत टिकून राहतात आणि प्रदीर्घ काळापर्यंत औषधेही चांगली राहतात. संभाव्य ऊर्जा व गतीशीलता या औषधी गुणधर्मामुळे माणसाच्या मनावरही ही औषधे अत्यंत सकारात्मक व परिणामकारकरीत्या कार्य करतात.

**रोगाचे दमन व त्यांचा होमियोपॅथीक इलाज (Suppression of Disease)**

आजच्या भागात आपण अत्यंत महत्त्वाच्या विषयावर माहिती बघणार आहोत. आणि तो म्हणजे रोगाचे दमन – म्हणजेच रोग बरा न करता, जेव्हा आत दाबून टाकला जातो त्यावेळी होमिओपॅथीची औषधे कशी उपयोगी पडतात ते आपण पाहू या. आता रोगाचे दमन किंवा आत दडपून टाकणे (suppression) म्हणजे काय ते आपण पाहू या.

आपण जेव्हा चैतन्यशक्तीची माहिती पाहिली त्यात आपण असे पाहिले की ही शक्ती संपूर्ण शरीर व मन यांना सांभाळते व त्यांच्यात समतोल व समन्वय राखण्याचे काम करते. जेव्हा बाहेरील गतिमान शक्ती या चैतन्यशक्तीवर परिणाम करते तेव्हा माणसाची रोगप्रतिकारक शक्ती कमी होऊन मग त्याला आजार होतो. जेव्हा माणसाला आजार होतो त्यावेळी ही चैतन्यशक्ती ठरावीकपणे प्रतिक्रिया देते. चैतन्यशक्तीची ही प्रतिक्रिया शरीरावर उमटते ती विविध लक्षणे व चिन्हे (symptoms & signs) यांच्या स्वरुपात. ही लक्षणे जेवढ्या चांगल्या प्रकारे दिसून येतात तेवढाच डॉक्टरांना तिचे उपचार करणे सोपे जाते. जेव्हा सर्व लक्षणे व्यवस्थित दिसू लागतात तेव्हा आजाराचे व्यवस्थित निदानसुद्धा होते व त्यावरील औषधे शोधणे सोपे होऊन जाते. इथपर्यंत चैतन्यशक्ती (vital force) नैसर्गिकरित्या प्रतिक्रिया देत असते. आणि जसे आपण बघितले की प्रत्येक माणसाच्या शरीरात जी शक्ती असते ती दुसऱ्यापेक्षा वेगळी असते. त्यामुळे प्रत्येक माणसाची आजार व्यक्त करण्याची व लक्षणे दाखवण्याची पद्धतही वेगळी असते. उदा. दोन माणसांचे सांधे दुखत आहेत. तर एकाला बर्फाने शेकले तर आराम मिळतो तर दुसऱ्याला गरम पदार्थांनी शेकले तर आराम मिळतो, म्हणजे प्रत्येकाची वैयक्तिक प्रतिक्रिया ही फार महत्त्वाची असते, परंतु काही कारणे किंवा घटकांमुळे चैतन्यशक्तीची ही नैसर्गिक प्रतिक्रिया म्हणजेच आजाराची लक्षणे ही दाबली जातात व रोगाचे खरे स्वरूप आपल्याला दिसून येत नाही. यालाच रोग दमन किंवा suppression असे म्हणतात.

आता आपण असे काही बाह्य घटक पाहू या की ज्याच्यामुळे चैतन्यशक्ती प्रभावित होते व आजाराची लक्षणे दाबली जाऊ शकतात. प्रथमतः आपण काही मानसिक लक्षणे पाहू जसे भीती, घाबरणे याशिवाय अतिआनंद, अतिप्रमाणात लैंगिक संबंधांची हाव, एकतर्फी प्रेम, अतिदुःख, कुटुंबातील किंवा जवळच्या माणसाचा मृत्यू, उद्योगधंद्यात होणारे नुकसान किंवा व्यवसायातील काळजी इत्यादी या आणि अशा प्रकारच्या बाह्य घटकांमुळे माणसाच्या मनावर परिणाम होत असतो व या परिणामांमुळे शरीराची नॉर्मल कार्यपद्धती बिघडून जाते. त्यामुळे चैतन्यशक्तीचा नैसर्गिक कामात अडथळा येतो व लक्षणे सुद्धा दाबली जातात. अशा वेळी होमिओपॅथीमध्ये या बाह्य घटकांचा व त्याचा शरीरावर व मनावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास केला जातो. या घटकांमुळे माणसाला नक्की काय त्रास होतोय याची पडताळणी करून औषध ठरवताना या गोष्टींचाही महत्त्वाने विचार केला जातो. या घटकांबरोबर काळजी, चिंता, महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यात येणारा शारीरिक व मानसिक थकवा किंवा तणाव यामुळे चैतन्यशक्तीचे नैसर्गिक कार्य बिघडते व माणसाची सहजता निघून जाते व लक्षणे दिसून येतात. या मनाच्या भावना फक्त त्या वैयक्तिक स्तरावर कार्य करतात व दुष्परिणाम करतात असे नाही तर पुढच्या पिढीतही दिसून येतात. मुख्यत्वे जर लहान बाळाला दूध पाजणारी आई असेल व तिला या घटकांचे दुष्परिणाम भोगावे लागत असतील तर हे दुष्परिणाम लहान बाळापर्यंत सुद्धा जाऊ शकतात, तसेच गरोदरपणात घेतल्या गेलेल्या ताणतणावाचाही बाळावर थेट परिणाम होऊ शकतो. पुढील भागात आपण या रोगदमनाविषयी आणखी कारणे व महत्त्वाची माहिती पाहणार आहोत.

माणसाच्या मानसिक ताण आणि तणावाचा शरीरावर थेट परिणाम होत असतो व त्यामुळे चैतन्यशक्ती कशी कमकुवत होते ते आपण पाहिले.

# सारस्वत विद्यार्थी सहाय्यक मंडळी, मुंबई

सारस्वत विद्यार्थी सहाय्यक मंडळी ही संस्था १९०२ साली गिरगाव-मुंबई येथे स्थापन झालेली ज्ञातीची एक अग्रगण्य संस्था आहे. ही संस्था गौड सारस्वत ब्राह्मण समाजातील (सर्व पोटभेदांसह) गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना गेल्या १२ दशकांपासून शिक्षणासाठी अर्थसहाय्य करीत आहे.

## * शिष्यवृत्ती *

सा.वि.सा.मंडळी प्राथमिक शाळेपासून, उच्च माध्यमिक तसेच महाविद्यालयीन पदवी परीक्षेपर्यंत ज्ञातीतील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना, शिक्षण चालू असेपर्यंत प्रतिवर्षी अर्थसहाय्य करीत असतेच त्याचबरोबर एखाद्या विषयात प्राविण्य मिळवण्यासाठी वा उच्च शिक्षणासाठी येत्तदेशीय व परदेशी जाणाऱ्या विद्यार्थ्यांस मंडळाच्या नियमानुसार कर्जाऊ शिष्यवृत्त्याही देण्यात येतात.

### :: गुणवत्ता पारितोषिके ::

अनेक दाते, मंडळींकडे काही रक्कमा ठेवत असतात व अशा रकमांच्या व्याजातून

(अ) **माध्यमिक शालांत परीक्षा**

(ब) **उच्च माध्यमिक शालांत परीक्षा**

(क) **पदवी व पदव्युत्तर परीक्षा**

(ड) **अभियांत्रिकी, वैद्यकीय, व्यवस्थापन व तत्सम अभ्यासक्रम**

(इ) **क्रीडा वा कला नैपुण्य.**

अशा विविध क्षेत्रातील सुयशाबद्दल दात्यांच्या अटीनुसार रोख पारितोषिके दिली जातात. तरी सारस्वत ज्ञातीतील विद्यार्थ्यांनी अधिक माहितीसाठी व विहित नमुन्यातील अर्जांसाठी खालील पत्त्यांवर संपर्क साधावा.

### :: गिरगाव कार्यालय ::

सारस्वत विद्यार्थी सहाय्यक मंडळी, चिकित्सक समूह हायस्कूल, पहिला मजला, खाडीलकर मार्ग, सदाशिव क्रॉस लेन, गिरगाव, मुंबई ४००००४ * दूरध्वनी क्र.०२२-२३८६९१६७

:: संपर्काची वेळ ::

सोम ते शुक्र संध्याकाळी ६.००ते ८.०० * शनि. : सायं ४.३० ते ६.००

### :: बोरिवली कार्यालय ::

सारस्वत विद्यार्थी सहाय्यक मंडळी, माडगावकर वसतीगृह, कोर्ट लेन, बोरिवली पश्चिम, मुंबई ४०००९२.

:: संपर्काची वेळ ::

सोम ते शुक्र संध्याकाळी ६.०० ते ८.०० * शनि : सायं ४.३० ते ६.००

दूरध्वनी क्र. ०२२-२८९००७७८



काही आजारांमध्ये आपण असे बघतो की आजाराच्या लक्षणांना तात्पुरता आराम पडावा म्हणून काही औषधोपचार केले जातात यात रुग्णाला तात्पुरते बरे वाटतेही. उदाहरणार्थ पाहायचे झाले तर आपण वेदनाशामक औषधांचे घेऊ व एखाद्या जुनाट आजारावर तात्पुरता वेदना कमी करण्यासाठी म्हणून लोक सतत वेदनाशामक गोळ्या (Pain Killer) घेत राहतात पण या वेदनाशामक गोळ्यांमुळे मूळ आजार बरा होत नाही तर वरवरचे दुखणे तात्पुरते कमी होते. व औषधांचा परिणाम संपताच परत चालू होते. याशिवाय या औषधांचा मूत्रपिंडावर वाईट परिणाम होत असतो. तो वेगळाच, सतत ही तात्पुरता आराम देणारी औषधे घेत राहिले तर मात्र आजाराची वा रोगाची पूर्ण दिशाच बदलते, हा आजार अजून खोलवर जातो. वरकरणी बरे वाटते पण आजार जास्त महत्त्वाच्या अवयवांकडे पसरतो व शरीरावर त्याचे देखील परिणाम दिसू लागतात व हळूहळू मग आजार असाध्य होतो. हे एक प्रकारचे रोग दमन किंवा suppression आहे, त्यामुळे मूळ आजार तर वाढतोच आणि त्याशिवाय नवीन आजारही तयार होतो, जो अजून कुठल्या तरी अवयवाला त्रास देतो.

होमिओपॅथीक चिकित्सकांकडे अशा अनेक केसेस येतात जेथे औषधांच्या अतिसेवनामुळे व दुष्परिणामांमुळे मूळ रोगाची लक्षणेच दडपली जातात व पर्यायाने तो रोग असाध्य होऊन जातो, या औषधांच्या परिणामांमुळे चैतन्यशक्तीला स्वतःच्या पद्धतीने व्यक्त होण्यापासून रोखले जाते व त्यामुळे आजाराची खरी लक्षणे व स्वरूप कळून येत नाही.

आता आपण एका अतिशय महत्त्वाच्या गोष्टीबद्दल माहिती घेणार आहोत, शरीरातील नैसर्गिक लक्षणे दडपण्याचे काम काही औषधे किंवा तत्सम पदार्थ करतात. नैसर्गिक स्त्रावांपैकी एक स्त्राव म्हणजे आपला घाम. शरीरातील उष्णता समतोल करण्यासाठी शरीरात घामाच्या ग्रंथी देवाने दिलेल्या आहेत. घाम येणे ही अत्यंत नॉर्मल व नैसर्गिक क्रिया आहे. साधारणपणे डोके, पाय, काख अशा ठिकाणी जास्त घाम येतो, शरीरातील अपायकारक द्रव्येसुद्धा घामावाटे बाहेर टाकली जातात व शरीराचा समतोल राहतो, ज्यावेळी या नैसर्गिक घाम येण्याच्या ठिकाणी डीओडरंट, स्प्रे, औषधी पावडर किंवा काही जेल (Gel) लावले जाते तेव्हा शरीराचा हा नैसर्गिक स्त्राव दाबला जातो, दडपून टाकला जातो व परिणामी शरीरातील अपायकारक द्रव्ये जी घामावाटे बाहेर टाकली जातात ती शरीरातच राहतात व पुढे मागे त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतात.

Natural discharge म्हणजे नैसर्गिक स्त्रावांमध्ये महिलांमधील मासिक पाळीही देखील येते. महिलांना येणारी मासिक पाळी ही अत्यंत नैसर्गिक गोष्ट आहे. परंतु कित्येक स्त्रिया मासिक पाळीच्या मधे काही संप्रेरके म्हणजेच हार्मोन्स घेत राहतात व या हार्मोन्समुळे मासिक पाळीचा स्त्राव हा दाबला जातो. कित्येकदा गर्भनिरोधक गोळ्या ज्या मुख्यत्वे संप्रेरकेच (हार्मोन्स) असतात त्यांचा अतिरेकी वापर केल्यामुळे मासिक पाळीच्या नैसर्गिकतेवर परिणाम होतो व त्याचाच परिणाम म्हणून मग स्त्रियांमध्ये हल्ली गर्भाशयाच्या संबंधित गंभीर आजार होण्याचे प्रमाण वाढले आहे. याच सप्रेशनमुळे मग अनेक वेळा गर्भाशय तसेच स्तनांचा कर्करोग होण्याचाही धोका असतो, म्हणूनच या अशा औषधांचा वापर हा विचार करूनच करावा, रोगाच्या दमनाविषयी आपण अजूनही काही महत्त्वाची माहिती घेणार आहोत पण ती पुढील भागात.

***

*लेखक हे वैद्यकीय व्यावसायिक आहेत.*
*मोबाईल - ९८६९०६२२७६*



nkgsbmatrimony.com

Matrimony Portal Dedicated for Saraswat Community

Register Online
Get Approved
Pay Online
Start Browsing the Profiles !

Contact: 9960576092 / 9922168725 / 8928850193
Powered by, NKGSB Sangh Thane Manch

# काहीतरी ढासळलंय!

पाऊस रंगात आला होता. तोच दार वाजलं. ओल्या कंच भिंतीत पाणी पिऊन फुगलेलं लाकडी दार भेसूरपणे किरकिरत उघडलं, दारात नखशिखांत भिजलेले वडील उभे! वडिलांचा दरारा आणि बाहेरचा मिट्ट काळोख, एकदमच घरात शिरले...

आईनं विस्तवावर पळी चांगली कडक तापवली, अन् बाहेरचं दार अर्धवट उघडत मुसळधार पावसाला चांगला सणसणीत चटका दिला!

“मेल्या, आता तरी तोंड काळं कर तुझं!”, चिडचिड करतच तिनं धाडकन् दार लावून घेतलं.

आजचा सलग पाचवा दिवस! अंगात यावं तसं पिसाळून कोसळतोय हा वरून. खाली ती भुई तरी कुठवर सोसणार? शेवटी तिनं पण हात टेकले. तसा हिरव्याकंच माळाला पायदळी तुडवत पाण्याचे लोटच्या लोट घराभोवतीनं दंगल करू लागले, आणि पावलाइतकं पाणी गुडघाभर कधी झालं कळलंच नाही.

आज तर जणू माजावर आल्यासारखा कोसळतोय पाऊस. दिवसभर बिचारी पन्हाळ उर फाटेस्तोवर पाणी ओकत होती. बाहेर कुत्री आडोशाला पार मुटकुळं करून गप पडून होती. अधूनमधून अंगावरचं पाणी झटकण्यापुरती काय ती अंग हलवायची. पाखरांचे तर हाल बघवत नव्हते. कोवळ्या झाडावरची कोवळी घरटी केव्हाच जमिनीनं झेलली होती. वळचणीला चार दोन साळुंक्या भेदरून बसल्या होत्या. परसात बांधलेल्या आडव्या बांबूवर एकच कावळा जमिनीकडं गोठून गेल्यागत बघत बसला होता. वर पत्र्यावर जणू ताश्याची टिप्पर घुमावी तसा थर्रर्रर्रर्रर्र आवाज लय धरून सुरूच होता.

दुपार कलंडली तसा पावसानं उजेडाला पार कंबरेत लाथ घालून हाकलूनच दिला. लगोलग माजघरात पहिले शिरला तो अंधार! आईनं तोवर घाईघाईनं जेवणं, भांडी उरकून घेतलं होतं. आम्हा पोरांना सक्त ताकीद दिली होती, की खबरदार खाटेवरून खाली उतराल तर! तेवढ्यात पोतराजानं आभाळाच्या पाठीवर जणू कडाडकन् आसूड ओढला.

आई म्हणाली, “नक्की जवळपास कुठंतरी वीज पडलेली दिसतेय. ह्यांची घरी यायची वेळ होईल आता, तेवढा तरी जरा थांबू दे रे पाऊस!”

घराला अंधारानं अजूनच मिठी मारली. आईनं देवापाशी दिवा लावायला घेतला. फडफडत ज्योत कशीतरी उजेड फेकत राहिली. उग्रट वासाच्या उदबत्तीसमोर देवाला मिटल्या डोळ्यांनी नमस्कार करत आमचं शुभंकरोती सुरू झालं. मला आवडायचं असं बसून सगळं म्हणायला. फक्त ते तेराच्या पुढचे पाढे म्हणजे अंगावर काटा यायचा. बाहेर धो धो कोसळणाऱ्या पावसाच्या आवाजातही आईचं लक्ष आमच्याकडे बरोबर होतं. ‘तेरी साती किती म्हणालास?’ मग परत तेरा एके तेरा पासून सुरू! पाऊस कोसळतच होता. आतापर्यंत घरातले ते चाळीसचे पिवळे बल्ब मरगळलेला प्रकाश घरभर शिंपडायला लागले होते. दाराशी आईनी पेला उपडा करून ठेवला. बाहेर गेलेलं माणूस लवकर घरी येतं म्हणे!

पाऊस आता रंगात आला होता. तोच दार वाजलं. ओल्या कंच भिंतीत पाणी पिऊन फुगलेलं लाकडी दार भेसूरपणे किरकिरत उघडलं, दारात नखशिखांत भिजलेले वडील उभे! हातातल्या छत्रीची पार दैना झालेली दिसत होती.

आईने आधी जाऊन टॉवेल आणला न् म्हणाली, “आधी कपडे बदला, डोकं कोरडं करा, मी तोवर चहा ठेवते.”

नेमके तेव्हाच लाईट गेले. वडिलांचा दरारा आणि बाहेरचा मिट्ट काळोख, एकदमच घरात शिरले. आईने पुढचं मागचं दार घट्ट लावून घेतलं. दोन्ही दारात एक एक चिमणी पेटवून ठेवली. प्रकाशामुळे ‘जनावर’ घरात शिरत नाही, त्यासाठी हा खटाटोप. वडिलांनी तोवर कपडे बदलून कंदील खाली काढला, अंगठ्याने वरची कडी उचलून अलगद काच बाहेर काढली. कपड्याने सगळी काजळी स्वच्छ पुसली. मग ते गोल बटणं फिरवून वात थोडी वर घेतली. पेटवली, आणि परत सावकाश काच लावून कंदील स्वयंपाकघरात आणून ठेवला. हे काम दुसऱ्या कोणी केलेलं त्यांना मुळीच खपायचं नाही. काचेवर इतकीसुद्धा काजळी त्यांना चालत नसे. भोवतीभोवतीनं फिरणारे आम्ही मग कंदीलाभोवती जेवायला बसलो. जेवताना, वाटेत कसं सगळीकडे पाणी भरलंय ते वडिलांनी अगदी रंगवून सांगितलं. आईचा चेहरा अजूनच काळवंडला काळजीनं! जेवता जेवता ती मधूनच ओल धरलेल्या भिंतीकडे

आणि तग धरलेल्या कौलांकडे पाहत होती.

पाऊस अजून तस्साच आदळतोय. कंदिलाच्या उजेडातच वडिलांनी अंथरुण घातलं. आईनं देवापुढचा दिवा शांत केला, देवाला नमस्कार केला अन् येऊन आडवी झाली. तशी आम्ही पोरं तिच्या उजव्या डाव्या कुशीत जाऊन झोपलो. वडील उजवा हात डोक्याखाली घेऊन कुशीवर वळून झोपायचा प्रयत्न करत होते. पण पावसाचा कर्कश्श आवाज कोणालाच झोपू देत नव्हता.

साधारणतः तासभर असाच गेला असेल, तोच ‘धप्प’ आवाज झाला. वडील लगेच उठले, कंदील मोठा केला आणि आवाजाच्या दिशेने स्वयंपाकघराकडे गेले आणि तसेच घाईघाई परत आले. आईला उठवलं, तिलाही दाखवलं, स्वयंपाकघराच्या भिंतीची एक वीट खाली पडली होती. दोघांच्याही अंगाचा थरकाप उडाला. सत्तर वर्षांच्या जुन्या भिंतींनी गेले पाच दिवस पावसाशी घेतलेली झुंज आज कुठेतरी डळमळली. भिंतीची एक वीट कोसळली. दोघांनीही आम्हाला मुलांना उठवलं आणि मधल्या खोलीत घेऊन गेले. तिथे आम्हाला झोपवून दोघेही तसेच काळजीनं बसून राहिले. पाऊस काही ऐकायला तयार नव्हता. डोळ्यात बोट घातलं तरी दिसणार नाही असा काळोख घराभोवती घिरट्या घालत होता. आणि पुन्हा एकदा आवाज आला, धप्प, धुडुं! वडील उठले, तसं आई काळजीनं म्हणाली, “काही कुठं जाऊ नका बघायला, काय व्हायचं ते होऊ दे, पण तुम्ही तिकडे जाऊ नका हो!” पण वडिलांना कुठला धीर निघतोय. ते हळूहळू जवळ जाऊन बघून आलेच. खोल आवाजात त्यांनी सांगितलं, “अजून चार विटा पडल्यात! दाराची वरची बाजू मोकळी झाली गं!” बहुदा दोघांनीही डोळ्याच्या कडा पुसल्या असाव्यात. पण काळोखात



सगळं लपवलं गेलं. मग त्यानंतर पाच दहा मिनिटांच्या अंतराने आवाज येतच राहिले, एक एक वीट पडतच राहिली. आम्ही जीव मुठीत घेऊन एकमेकांच्या आधारानं तसेच बसून होतो.

हळूहळू रात्र पुढे सरकत होती. पावसाचा जोर थोडा ओसरला होता. पूर्वेला झुंजूमुंजू व्हायला लागलं होतं. अंधार थोडा विस्कटायला लागला होता. रात्र तर सरली म्हणून आई वडील सुस्कारा सोडतायत तोवर एकच मोठ्ठा आवाज झाला आणि छपरासकट सगळं स्वयंपाकघर जमीनदोस्त झालं. एवढ्यावरच पावसाचं समाधान झालं नाही म्हणून आतापर्यंत शाबूत असलेला व्हरांडाही एकाएकी ढासळला. सुदैवाने आम्ही बसलो होतो ती मधली खोली तेवढी अजून तग धरून होती. पण केव्हा काय होईल सांगता येत नव्हतं.

एकदाचं फटफटलं! बाहेर माणसांची जरा चाहूल जाणवायला लागली. पाऊससुद्धा ओसरला. तसे भीत भीत आम्ही सगळे तो पडक्या भिंतींचा ढिगारा ओलांडून बाहेर मोकळ्या अंगणात आलो. एव्हाना आमचं घर पडल्याची बातमी आजूबाजूला पसरली. कोणीतरी आम्हाला त्यांच्या घरी घेऊन गेलं. दिवस जरा वर आल्यावर आईवडील परत घराकडे गेले. घराच्या चारही बाजूच्या भिंती ढासळल्या होत्या. पण देवळीतला गणपती मात्र तसाच होता, सुरक्षित! आईला त्याचंच खूप समाधान वाटलं.

त्यानंतर आम्ही काही दिवस काकांच्या घरी राहिलो. तोवर जुनं झालेलं हे पडकं घर पूर्णच पाडून सगळं पुन्हा नव्याने बांधायला घेतलं. ह्या सगळ्यात झालेलं कर्ज पुढचे अनेक पावसाळे पुरलं!

पण आज एका गोष्टीचं आश्चर्य वाटतं, की त्या रात्री जर आम्ही आसरा घेतलेली खोलीसुद्धा पडली असती तर? पण देवळीतला बाप्पा रात्रभर ती भिंत जणू धरून बसला होता आमच्यासाठी. रोज त्याच्यासमोर शुभंकरोती म्हणायचो न आम्ही, मग आमच्यासाठी तो एवढं तर नक्कीच करणार ना!

आज इतक्या वर्षांनंतर बाहेर तस्साच पाऊस कोसळतोय! लाईटही गेलेत. पण आता घरात इन्व्हर्टर आहे. काळोखाला इथे प्रवेशच नाही. भिंती मजबूत आहेत, ओल येतच नाही. फक्त शुभंकरोती तेवढी ऐकायला येत नाहीये. देवघरात इलेक्ट्रिकची समई चोवीस तास मिणमिणतेय, पण उदबत्ती मात्र लागतच नाही. धुराची ॲलर्जी आहे! पूर्वीपेक्षा घर खूप भक्कम आहे आता, तरीसुद्धा काहीतरी ढाऽसळऽलंऽय!

***

- लेखक : अज्ञात

शेअरिंगचं सौजन्य : निनाद अरविंद देशपांडे

The Board of Trustees of the Temples, Charitable Institutions and Funds of the Goud Saraswat Brahman Community of Mumbai
Popularly Known as

(Estd : 1879) (स्थापना : १८७९)

**Goud Saraswat Brahman Temple Trust** — **गौड सारस्वत ब्राह्मण टेंपल ट्रस्ट**

Shree Balaji Ramji Mandir Buillding, Second Floor,
41-47, Bhuleshwar Road, Mumbai 400 002

श्रीबालाजी रामजी मंदिर बिल्डींग, दुसरा मजला,
४१-४७, भुलेश्वर रोड, मुंबई ४०० ००२

Tel.: 022-2240 4482* Public Trust No. A558 B* E-mail : gsbtempletrust@gmail.com*Mahim Office : Tel. : 022-24446956



# जी एस बी टेंपल ट्रस्ट, मुंबई (स्थापना - १८७९)

# (मुंबईतील सर्वात जुना देवालयांचा ट्रस्ट)

## ट्रस्टच्या अधिपत्याखालील देवालये

(१) शितळादेवी, माहीम परिसरातील शांतादुर्गेच्या देवालयासह काही देवालये.
(२) मुरलीधर मंदिर, माहीम.
(३) श्रीवालुकेश्वर मंदिर, बाणगंगा.
(४) श्रीभुलेश्वर मंदिर, भुलेश्वर
(५) श्रीबालाजी रामजी मंदिर, भुलेश्वर.

बाणगंगा तलावही जी एस बी टेंपल ट्रस्टच्या मालकीचा आहे.

## ट्रस्टचे उपक्रम

(१) सर्व जातींच्या, सर्व धर्मांच्या, सर्व पंथांच्या गरीब व हुशार विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत देण्यात येते.
(२) सर्व जातींच्या, सर्व धर्मांच्या, सर्व पंथांच्या गरीब रुग्णांना हॉस्पिटलाच्या खर्चाची काही प्रमाणात भरपाई देण्यात येते.
(३) धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा (राजकीय संघटना वगळून) अन्य सर्व संघटनांना आर्थिक मदत देण्यात येते.
(४) गरजू व गरीबांना आर्थिक मदत देण्यात येते.
(५) गरजू संस्थांना तांदूळ व साडी वाटप करण्यात येते.
(६) कोरोना बाधित रुग्णांना फार मोठ्या प्रमाणात ट्रस्टने आर्थिक मदत केली आहे.
(७) कोरोनामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या बऱ्याच व्यक्तींना ट्रस्टने आर्थिक मदत केली आहे.
(८) नैसर्गिक आपत्तीत सापडणाऱ्या संस्था व व्यक्तींना ट्रस्ट आर्थिक मदत करते.
(९) कुटुंबियांचे देव - ज्या सारस्वत ब्राह्मण कुटुंबांना त्यांच्या काही वैयक्तिक कारणांमुळे त्यांच्या घरातील (गावातील किंवा मुंबईतील) देवांची दररोज पूजा करणे जमत नाही किंवा शक्य होत नाही असे विविध कुटुंबांचे देव हा ट्रस्ट स्वीकारतो. हे देव ठेवण्यासाठी खास सोय असून या देवांची ट्रस्टच्या पुजाऱ्यामार्फत रोज यथासांग पूजा केली जाते. यासाठी ट्रस्टच्या भुलेश्वर येथे मुख्य कार्यालयाशी संपर्क साधावा.
(१०) धर्मशाळा- आपल्या ट्रस्टच्या मालकीची मरीन लाईन्स (पूर्व) चंदनवाडी येथे धर्मशाळा असून येथे ज्ञातीतील तसेच ज्ञातीबाहेरील व्यक्तींचे निधनानंतरचे नववे, दहावे, अकरावे, बारावे व तेरावे हे विधी करण्याची सोय आहे.

**प्रविण कानविंदे**
अध्यक्ष

**शशांक गुळगुळे**
मानद सचिव व कायम विश्वस्त

**अवधूत दाभोळकर**
कायम विश्वस्त

**कल्पना प्रभू**
मानद खजिनदार



अनुराधा तेंडुलकर

# दंतवैद्य हरिभाऊ विष्णू कित्तूर

सचोटी, टापटीप आणि प्रामाणिकपणा हा हरिभाऊंचा स्थायीभाव, त्यांच्या दवाखान्यात नेहमी स्वच्छता आणि व्यवस्थितपणा असे. हत्यारांची मांडणी त्यांना अगदी व्यवस्थित लागे. अत्यंत मन लावून ते काम करत असत, त्यामुळेच त्यांनी पेशंटस्‌चा विश्वास आणि आपुलकी कमावली. त्यांच्या वैद्यकीय कारकिर्दीचा आढावा घेणारा हा लेख...

मागील शतकात कोल्हापूरात दंतवैद्य हरिभाऊ कित्तूर यांच्या नावाचा दबदबा होता. १ जानेवारी १९१५ रोजी बेळगावात जन्मलेल्या हिरभाऊंचे शिक्षण बेननस्मिथ हायस्कूलमध्ये झाले. त्यांचे वडीलही डॉक्टर होते. घरचे वातावरण सुशिक्षित, सुसंस्कृत सुस्थापित आणि सधन. कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमध्ये महाविद्यालयीन शिक्षण घेतल्यानंतर हरिभाऊंनी मुंबईच्या नायर डेंटल कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. लांब दाढी आणि उंच पारशी टोपीमुळे ते कॉलेजजीवनात प्रसिध्द होते. सुवर्णपदक मिळवून ते LDSc झाले. १९४५मध्ये कोल्हापूरात येऊन त्यांनी आपल्या प्रॅक्टिसला सुरुवात केली. त्यावेळी मात्र विद्यार्थीदशेतील आपल्या दाढी व पारसी टोपीला निरोप दिला. त्या काळात कोल्हापूरात मोजकेच डेंटिस्ट होते. त्यामुळे डॉ. हरिभाऊंचा जम बसायला वेळ लागला नाही. सकाळी ९ ते १२ आणि सायंकाळी ६ ते ८ ही ठरलेली वेळ. सचोटी, टापटीप आणि प्रामाणिकपणा हा त्यांचा स्थायीभाव, दवाखान्यात नेहमी स्वच्छता आणि व्यवस्थितपणा असे. हत्यारांची मांडणी त्यांना अगदी व्यवस्थित लागे. अत्यंत मन लावून ते काम करत असत, त्यामुळे पेशंटस्‌चा विश्वास आणि आपुलकी कमावली त्यांनी.



दंतवैद्य हरिभाऊ कित्तूर

हरिभाऊंना लहानपणी खेळांची मोठी आवड होती. गोट्या, स्वत: बनवलेले पतंग उडवणं, खो-खो, दिवाळीत आकाशदिवे तयार करणे आणि इतरांना शिकवणे, सुट्टीत आसपासच्या मुला-मुलींना जमवून पोहायला शिकवणे याची त्यांना फार हौस. घरातच बेकरी होती, त्यामुळे केकवर आयसिंग करणेही त्यांना आवडायचे. पार्टीसाठी बिर्याणी तयार करण्यात त्यांचा हातखंडा होता. साधारणपणे (त्या काळात तरी) स्त्रियांसाठी राखीव समजल्या जाणाऱ्या विणकामात आणि भरतकामामध्येही त्यांना रस होता आणि ते सुंदर करत असत.

डॉ. हरिभाऊंचा विवाह इंदुमती इडगुंजी यांच्याशी झाला. त्या विवाहपूर्वी शिक्षणाधिकारी होत्या. विवाहानंतर त्या कोल्हापुरातील पद्मराजे गर्ल्स हायस्कूलमध्ये विद्यार्थीप्रिय शिक्षिका झाल्या.

डॉ. हरिभाऊंचा स्वभाव अतिशय शांत. त्यांचे सारे छंद एकट्याने, एकाग्र चित्ताने करण्याची वृत्ती त्यामुळे स्वाभाविकपणे ते समाजापासून जरा अलिप्त राहत. मित्रमंडळीही मोजकी. प्रसिद्धीपराङ्मुखतेमुळे सामाजिक घडामोडींपासून जरा लांबच राहत. गॉसिपिंग त्यांना मुळीच आवडत नसे. कॉलेज जीवनात त्यांनी मेंडोलिन वादनात प्राविण्य मिळवले होते. नंतरही हार्मोनियम, तबला, बासरी, दिलरुबा, माऊथ ऑर्गन इ. वाद्ये ते अत्यंत सराईतपणे वाजवत असत. पण त्यांचे सर्वांत आवडते वाद्य म्हणजे सारंगी. शास्त्रीय संगीताचे रीतसर शिक्षण घेऊन ते अखेरपर्यंत रोज एक - दोन तास तरी रियाज करत असत. कोल्हापूरच्या संगीत क्षेत्रात त्यांना आदराचं स्थान होतं. संगीत स्पर्धांसाठी त्यांना आवर्जून निमंत्रण असे.

प्लॅस्टरवरील कोरीवकामाची त्यांना फार आवड. साचा बनवून नव्हे तर निव्वळ कोरीवकाम करून ते कलाकृती साकार करत. एकेका कलाकृतीसाठी सहा सहा महिने तर कधी कधी वर्षही लागे. त्यासाठी डॉक्टरांचा शांत, संयमी स्वभाव उपयोगी पडत असावा. या कलाकृतींची प्रदर्शने पुढे मुंबई, पुणे, कोल्हापुरातही भरवली. त्यापैकी काही नमुने त्यांच्या पुढल्या पिढीने आजही जपून ठेवलेले आहेत.

आपला व्यवसाय, संगीत साधना, कोरीवकामाचा छंद

हीच हरिभाऊंची जीवनसाधना होती. व्यवसायातून निवृत्ती घेतल्यानंतर त्यांनी चरखा खरेदी केला आणि स्वत: सूत काढून बनवलेले कपडे ते वापरू लागले. ९ नोव्हेंबर १९९० रोजी त्यांनी अत्यंत शांतपणे या जगाचा निरोप घेतला.

वैद्यकीय क्षेत्रातील मंडळींना विविध कलांची आवड असल्याचं आपण पाहतोच. पण आपल्या स्वीकृत जीवनकार्यात यशस्वी होऊनही आपल्या आवडत्या कलांमध्येही परिपूर्णतेचा ध्यास घेणाऱ्या या 'योगी' दंतवैद्याला मन:पूर्वक अभिवादन!

***

*लेखिका सामाजिक कार्यकर्त्या असून लेखनही करतात.*
*मोबाईल - ९८८१२०४०५०*

## शांतादुर्गा कुलस्वामिनी



शांतादुर्गा कुलस्वामिनी
माय तू, गोमंतवासिनी
पूजन, अर्चन, करू तिज वंदन ॥धृ॥

मांगरिशाची प्रिय कामिनी
भक्तांची गे माय भवानी
पूनित होऊ घेऊनी दर्शन ॥१॥
पूजन, अर्चन, करू तिज वंदन

दुर्गा परि ती शांतरुपिणी
हरी-हरांचा समेट करूनी
विश्व शांतीचा मंत्र जपून॥ २॥
पूजन, अर्चन, करू तिज वंदन

कृपावंत ती, ती वरदायिनी
भाग्यवंत मी, ती कुलस्वामिनी
पामर मी, दे आशिर्वचन ॥३॥
पूजन, अर्चन, करू तिज वंदन

**- नेत्रा श्रीपाद वैद्य -**

# एक सत्य

**- अशोक नाडकर्णी**

आयुष्य हे सुंदर आहे. जीवन जगताना आनंदाचे क्षण आपल्या आयुष्यांत येतात. त्यांचा त्या त्या वेळेस आनंद झेलला नाही तर तो क्षण पुन्हा परत येत नाही. आपल्या जीवनांत नातेवाईक व मित्र मैत्रिणी नकळत येत असतात. त्यांचा सहवास हा एक अवर्णनीय आनंद असतो. काही मित्र राहतात व काही नवे मित्र जोडले जातात. समोरच्याचे मन समजायला समोरच्याचे मनच व्हावं लागतं. ज्याला हे जमतं त्याला निनावी नात्याची कमी नसते. मैत्रीचं नातंच नाजूक फुलासारखं असतं, अलगद फुलणारं असतं. एकदा फुलून आलं की जन्मभर गंध देत झुलणार. मैत्री म्हणजे त्याग असतो, प्रेमळपणे जगण्याचा एक भाग असतो. अशी मैत्री जोपासावी लागते. म्हातारपणासाठी आपण गुंतवणूक करतो. मैत्रीसाठीसुद्धा गुंतवणूक करावी लागते, वेळ द्यावा लागतो, प्रयत्न करावे लागतात. त्यामध्ये कृत्रिम अथवा वावगं असं काहीही नसतं. बागेतल्या रोपाला खतपाणी द्यावेच लागते म्हणून फुलांची टवटवी कमी नाही लेखत. आणि म्हणूनच म्हणावं लागतं संध्याकाळच्या उंबरठ्यावर मैत्रिची चार फुले हाताशी नसतील तर आपण दरिद्रीच. बँक बॅलन्समध्ये पुढे शून्य कितीही असली तरी, आपण एकटे येतो व एकटेच जातो. आयुष्य क्षणभंगूर आहे. उरलेले आनंदाचे क्षण निसटू देऊ नका. निसर्ग तुम्हाला बोलावीत आहे. त्याचे स्वागत करा. कारण, हे क्षण पुन्हा येत नसतात.

शायरने म्हटले आहे-
जिंदगी के सफरमे, गुजर जाते है जो मुकाम
वो फिर नहीं आते, वो फिर नहीं आते...



# जागतिक मैत्री दिनाच्या निमित्ताने

## एक होती 'ही', एक होती 'ती'

एक होती 'ही' आणि एक होती 'ती'. दोघी समवयस्क आणि अनेक वर्ष शेजारी-शेजारी. म्हणजे तशी 'ही' राहायची पहिल्या मजल्यावर आणि 'ती' दुसऱ्या. पण शेजारधर्म मात्र कायमच होता.

कधी काही लागलं की हक्कानी सांगायच्या एकमेकांना. दोन्ही घरचा एक तरी डबा किंवा वाटी कायम दुसऱ्या घरी असायचीच.

एके दिवशी 'ही'च्या ह्यांना पावसामुळे किराणा आणायला जमलं नव्हतं.

मग काय? 'ही' गेली वाटी घेऊन साखर आणायला 'ती'च्याकडे.

'ती'नीसुद्धा 'ही'चं हसत स्वागत केलं आणि दिली लगेच साखर.

'ही' चपला घालत थोडी आडोशाला काय गेली तशी 'ती' जोरात पुटपुटली.

'रोजचाच ताप झालाय हा. कटकट नुसती!' असं म्हणत वैतागून 'धाडकन' दार लावलं जोरात.

'ही'ला ऐकू गेलंच. बहुतेक ऐकू जाण्यासाठीच जोरात बोलली होती 'ती'.

मग 'ही'ची पण जरा सटकलीच. तणतणत खाली आपल्या घरी आली. 'एक वाटी साखर काय मागितली तर इतकं? जसं काही इस्टेट मागितली 'ती'ची!'

असे ताशेरे झोडत 'ही'नी दुप्पट जोरात आपलं दार लावलं. इतकंss की वर 'ती'ला मुद्दाम ऐकू जावं.

तेव्हापासून कानाला खडा.

'ही' आणि 'ती' यांचं संभाषणच बंद.

'ती'ला कळलंच नाही नेमकं काय झालंय. म्हणून एक-दोनदा गेली बोलायला. पण 'ही' ढुंकुनसुद्धा बघायची नाही 'ती'च्याकडे

दोस्ती मे दरार...

काहीच दिवसात बिल्डिंगला पालिकेकडून धोकादायकची पाटी लागली. मग सगळेच वेगवेगळ्या दिशांना पांगले. दोघींचा काहीच संबंध आणि संपर्क उरला नाही.

काळ लोटला... वयं वाढली.

जवळ एक आध्यात्मिक शिबिर होतं चार दिवसांचं दोघींनीही तिथं नाव नोंदवलं होतं. योगायोगाने दोघींचीही राहायची व्यवस्था एकाच खोलीत.

खूप गप्पा माराव्या असं वाटत असलं तरीही मनात दुरावा होताच अजून.

पण 'जुनं सगळं सोडून नव्याने संवाद साधा' अशी शिबिरातली शिकवण. म्हणून शेवटच्या दिवशी बोलल्या एकदाच्या.

'ही'ची तणतण मागील पानावरून पुढे...

'काय गं? xxx... इस्टेट मागितली होती का?' वगैरे वगैरे.

'का गं? असं का विचारतेस ?'

'मग रोजची कटकट म्हणत इतक्या जोरात तोंडावर दार आपटलंस ते माझ्या?'

'ती'नी डोक्याला हात लावला.

'बाप रे! म्हणून बोलत नव्हतीस होय इतके वर्ष?'

'अगं, ते मी तुला नाही, त्या दाराला म्हणत होते आमच्या!'

'आठवतंय ना, पावसाळा होता तेव्हा ?'

'कसलं फुगलं होतं ते दार. लावताना नाकी नऊ यायचे अगदी ! त्याला रोजचा ताप म्हणाले होते मी!'

'अय्याss हो का? हो बरोबर... आमचं पण दार खूप फुगलं होतं तेव्हा.'

दोघींचा 'रुसवा' कारण दाराचा 'फुगवा'.

तेव्हा लक्षात ठेवा 'पावसाळ्यात दारं फुगतात'.

कुणी तुमच्या समोर असं धाडकन दार लावलं तर गैरसमज नसावा. बिल्डिंगमध्ये दारांचा असा जोरात आवाज येऊ शकतो. तेव्हा 'नवरा बायकोचं भांडण झालं असेल' असे निष्कर्ष लगेच काढू नका.

आणि होss आपण सगळ्यांनीच 'मनाची दारं' मात्र फुगण्यापासून वाचवू या. किलकिली तरी ठेवू या निदान. चांगले विचार आत यायला आणि वाईट बाहेर घालवायला.

सरतेशेवटी सगळ्यात महत्त्वाचं...

कधीही काही वाटलं तर आडपडदा न ठेवता लगेच बोलू या एकमेकांशी. बरेचदा कारण क्षुल्लक असतं; पण आपण उगाच गंभीर समजतो.

बघितलं ना, 'ही' आणि 'ती'च्या चांगल्या मैत्रीची कितीतरी वर्षं वाया गेली. आणि कारण काय तर घराचं फुगलेलं आणि मनाचं रुसलेलं 'दार!'

लेखक - अज्ञात

With Best Compliments from

यज्ञो यज्ञेन कल्पताम्

या कुन्देन्दुतुषारहारधवला या शुभ्रवस्त्रावृता
या वीणावरदण्डमण्डितकरा या श्वेतपद्मासना
या ब्रह्माच्युत शंकरप्रभुतिभि दैवैः सदा वन्दिता
सा मां पातु सरस्वती भगवती नि:शेषजाड्यापहा

ALL INDIA SARASWAT CULTURAL ORGANISATION

Joining Hands in Harmony

The organisation aims at progressive goals and objectives
to promote Cultural, Educational and
Socio – Economic activities for the Saraswats

President
Dr. Ajit Gunjikar

Vice Presidents
Subhash Saraf Girish Joshi Girish Pikale Ulhas Kamat

Secretaries
Rajendra Pai Uday Redkar

Treasurer
Ramnath Juwarkar

Botawala Bldg., Sitaladevi Temple Rd., Mahim, Mumbai – 400016.
Website: www.aisco.org.in Email - office.admin@aisco.org.in



श्रेयसी वझे - मंत्रवादी

# अनेक आठवणींची ग्रेट भेट

'ग्रेट भेट' या  कार्यक्रमातून अनेक आठवणी, अनुभव जागवत  सुसंवादिनी मंगला राव-खाडिलकर आणि वैष्णवी कानविंदे-पिंगे यांनी रसिकांना निवेदन, पत्रकारिता, संहिता लेखन, वाहिनीवरील महत्त्वाच्या जबाबदाऱ्या या क्षेत्रांशी मुलाखतीच्या माध्यमातून जोडून घेतलं....

सारस्वत चेंबर प्रस्तुत 'ग्रेट भेट' हा उपस्थितांना आणि एकूणच निवेदन, पत्रकारिता, लेखन या क्षेत्रांत काही करू इच्छिणाऱ्यांना एक वेगळा दृष्टीकोन देऊन गेलेला कार्यक्रम झाला. या  कार्यक्रमातून अनेक आठवणी, अनुभव जागवत  सुसंवादिनी मंगला राव-खाडिलकर आणि वैष्णवी कानविंदे-पिंगे यांनी रसिकांना निवेदन, पत्रकारिता, संहिता लेखन, वाहिनीवरील महत्त्वाच्या जबाबदाऱ्या या क्षेत्रांशी मुलाखतीच्या माध्यमातून जोडून घेतलं. दोघींचा मंचावरचा प्रसन्न वावर, हसरा चेहरा, आत्मविश्वास, श्रोत्यांवरची पकड, शब्दांचा यथायोग्य वापर प्रेक्षकांना खूप काही देऊन गेला. मंगलाताईंनी त्यांच्या ४५ वर्षांच्या प्रदीर्घ कारकीर्दीतले अनेक खाचखळगे, आव्हानात्मक प्रसंग याविषयी

कुठल्या व्यक्तींनी त्यांना कसं कसं घडवलं हेसुद्धा सांगितलं. या क्षेत्रात येण्यासाठी आणि मुख्य म्हणजे टिकून राहण्यासाठी नवोदितांनी काय केलं पाहिजे याबद्दल मार्गदर्शन केलं.

दूरदर्शनवर काम करताना नेमकं कशाचं भान ठेवावं लागतं आणि रंगमंचावर कुठल्या गोष्टींना महत्त्व द्यावं लागतं हे खऱ्या घडलेल्या उदाहरणांवरून सांगत सांगत शेवटी या सगळ्यासाठी कसून अभ्यास आणि संयम कसा महत्त्वाचा आहे हे मंगलाताईंच्या बोलण्यातून जाणवत राहिलं. हजरजबाबीपणा, स्मरणशक्ती, प्रसंगावधान यांचं या क्षेत्रात कसं अनन्यसाधारण महत्त्व आहे हे विशद करायलाही त्या विसरल्या नाहीत. याला पुष्टी देण्यासाठी त्यांनी सुपरस्टार अमिताभ बच्चन, भारतरत्न लता मंगेशकर आणि एक राजकीय क्षेत्रातली बुजुर्ग व्यक्ती यांच्या एकत्रित मुलाखतीचा त्यांच्या बाबतीत प्रत्यक्ष घडलेला किस्सा सांगितला. सुरुवातीला तिघांची तीन दिशेला असलेली तोंडं मंगलाताईंच्या एका सूचक पण खुमासदार शेराने कशी हसरी केली आणि मग ती मुलाखत कशी उत्तरोत्तर रंगत गेली हे ऐकताना श्रोत्यांनाही अचंबित व्हायला झालं. सुमनसुगंध, एक मनोहर कथा  या अवघड पण आवश्यक पुस्तकांच्या



मंगला राव-खाडिलकर



वैष्णवी कानविंदे-पिंगे

# Connecting Saraswats Globally

Saraswat™ Chamber



## Be a Member. Contact Now

+91 99303 50236 | Administrator - Sanjay N. Kini
info@saraswatchamber.com

A powerful network to meet and interact with vibrant entrepreneurs at discussion forums, seminars, webinars and special member events.

### We strive to...

- improve networking among Saraswat entrepreneurs, professionals, community members who are in employment – locally and globally
- arrange various conferences and workshops on a diverse range of subjects organized in different cities and on virtual platforms
- build a community support system that supports business and help members seek better opportunities

**Global Chamber of Saraswat Entrepreneurs**
Registered Office:
2202, Manisha Garden, Navghar Road, Near Mulund Gymkhana,
Mulund East, Mumbai 400 081 | +91 99303 50236
CIN: U85310MH2019NPL330463

www.saraswatchamber.com

निर्मितीची कथा त्यांनी थोडक्यात सांगितली आणि अशा प्रकारे जर चरित्रात्मक लेखन करायचं असेल तर विविध दुवे शोधत, त्यांना जोडत आणि त्या मुख्य व्यक्तीला सातत्याने बोलतं करत कसं लेखन पुढे न्यावं लागतं हे त्यांच्या खास शैलीत सांगितलं.

वैष्णवीने तिचे पत्रकारितेमधले अनुभव, एकातून एक मिळत गेलेल्या संधी आणि त्यातूनच तिने इथवर स्वतःला कसं सकारात्मकरित्या घडवलं हे प्रेक्षकांना इतक्या सहजतेने सांगितलं की ऐकणाऱ्याला वाटू शकेल की हे सगळं सोपं असतं. परंतु तिने ज्या प्रत्यक्ष सेटवर घडलेल्या घटना सांगितल्या किंवा पत्रकारितेमधले तिला आलेले अनुभव, तिथलं कामाचं स्वरूप सांगितलं त्यावरून हे क्षेत्र तुमची दरवेळी नव्याने परीक्षा पाहणारं आहे हे ऐकणाऱ्यांना जाणवलं. रात्री -अपरात्री घटनास्थळी जावं लागणं, दिवसभर काम करून पुन्हा शूटिंग लांबल्यामुळे सेटवर उशिरापर्यंत थांबावं लागणं, कामातला मानसिक ताण, उशिरा घरी येताना असलेला धोका या सगळ्याला पुरून उरत वैष्णवीने तिचं करिअर कसं घडवलं हे ऐकताना तिचा खरोखरच अभिमान वाटत होता. चांगल्या माणसांची पारख करून त्यांना धरून राहणं, एकमेकांना साहाय्य करून उत्तम काम उभं करणं ही या क्षेत्राचीही निकड आहे हे लक्षात आलं. इथे प्रगती करायची असेल तर एकच एक गोष्ट धरून चालत नाही. तुम्हाला मागणीनुसार चांगल्या रीतीने स्वतःला बदलत राहावं लागतं. थोडा आपला हट्ट सोडून समोरच्यांचंही शांतपणे आणि सकारात्मकतेने ऐकून घ्यावं लागतं हे मनावर ठसलं. तुम्हाला मिळणारी संधी न सोडता तिचं सोनं कसं करता येईल यावर मेहेनत घ्यावी लागते. इतरांनी जर आपल्यावर विश्वास दाखवला तर ते काम हाती घेऊन आपले १००% त्या कामाच्या यशासाठी द्यावे लागतात. केवळ तुम्ही नटून थटून आलात आणि सुंदर दिसलात की तुम्ही दूरदर्शन, रंगमंच या क्षेत्रात यशस्वी होता असं नाही तर त्यासाठी भाषा चांगली करणं, चौफेर वाचन, लक्ष आणि भवतालाबद्दल नीट माहिती असणं फार गरजेचं आहे हा कानमंत्र तर मंगलाताई आणि वैष्णवी यांनी पुन्हा पुन्हा अधोरेखित केला. तसंच मालिकांसाठी क्रिएटिव्ह हेड म्हणून काम करताना कुठली व्यवधानं सांभाळावी लागतात हेसुद्धा वैष्णवीने सांगितलं. या माध्यमांमध्ये काम करू इच्छिणाऱ्या सगळ्यांना एक परिपूर्ण मार्गदर्शन यातून लाभलं.

या दोघींकडे अनुभवांचा, आठवणींचा एवढा खजिना होता की दिलेल्या वेळेत दोघींकडून जास्तीतजास्त कसं प्रेक्षकांपर्यंत पोहोचवता येईल हे एक आव्हान माझ्यापुढे होतं. सुदैवाने माझंही हेच क्षेत्र असल्यामुळे आणि या दोघींची आधीपासून ओळख असल्यामुळे आमच्या गप्पा सहज रंगत गेल्या. त्यांच्या कामाचा आलेख मी अभ्यासून आले होते. त्यामुळे नेमके प्रश्न विचारून या दोघींना बोलतं करण्यात मला बऱ्यापैकी यश आलं असावं हे प्रेक्षकांच्या दिलखुलास प्रतिसादावरून जाणवलं. मलाही यातून खूप शिकता आलं आणि अर्थातच या दोघींबरोबर स्टेज शेअर केल्याचा आनंद घेता आला. सारस्वत चेंबरची यासाठी मी नेहमीच ऋणी राहीन.

संपूर्ण कार्यक्रमाचं सूत्रसंचालन प्रसाद कुलकर्णी यांनी त्यांच्या काव्यमय शैलीत केलं. सारस्वत चेंबरचे डायरेक्टर अमित पंडित यांनी चेंबरच्या सभासदांसाठी विशेष फायदेशीर अशा सारस्वत बँकेच्या LEAP स्कीमविषयी उपस्थितांना महत्त्वाची माहिती दिली. तसंच सारस्वत चेंबरचे जे चालू आणि आगामी उपक्रम आहेत त्याविषयी सारस्वत चेंबरचे डायरेक्टर सिद्धार्थ सिनकर यांनी सविस्तर माहिती दिली. दोन तासांचा अतिशय रंगतदार आणि उद्बोधक असा हा कार्यक्रम झाला. 'उद्यमेन हि सिद्ध्यन्ति कार्याणि' हे संस्थेचं ब्रीद या निमित्ताने पुन्हा एकदा अधोरेखित झालं. मुख्य प्रायोजक सारस्वत बँक आणि सहप्रायोजक SBI जनरल यांचेही मनःपूर्वक आभार!

- लेखिका निवेदिका, गीतकार, मुलाखतकार आहेत.
मो. नं. ९८६७२५०८५१
www.fortuneentertainment.co.in

## भावांजली



**प्रभाकर नेरूरकर**

सारस्वत ब्राह्मण समाज (गिरगाव) या संस्थेचे विश्वस्त श्री. प्रभाकर शांताराम नेरूरकर (प्रवीण नेरूरकर) यांचे दिनांक ४.०६.२०२३ रोजी वयाच्या ७७व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांनी सारस्वत ब्राह्मण समाज, सारस्वत दीनवत्सल संघ व जीएसबी टेम्पल ट्रस्ट या सारस्वत संस्थांवर विविध पदांवर काम केले होते. त्यांना सामाजिक कार्याची आवड होती. गिरगाव येथील गरीब व गरजू व्यक्तींना नेहमी मदत करीत असत. सारस्वत दीनवत्सल संघाचे उपाध्यक्ष म्हणून त्यांनी शेवटपर्यंत काम केले. त्यांच्या मागे दोन मुलगे सुना व नातवंडे असा परिवार आहे.

सार्व.न्यास.नों.क्र.: के.ए.११६/को. 'ज्ञानसेवा' स्थापना : २०/०५/१९१५

# श्री सरस्वतीबाई गौड सारस्वत ब्राह्मण विद्यार्थी वसतिगृह

२९६४, सी वॉर्ड, दसरा चौक, फोन नं. ०२३१-२६४४१११, कोल्हापूर ४१६ ००२.

Email : saraswatboardingkolhapur@gmail.com Website : www.saraswatboarding.org

- राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी, ग्रामीण भागातील हुषार व होतकरु विद्यार्थ्यांना ज्ञानार्जनाची संधी मिळावी म्हणून १०७ वर्षापुवी दिलेली जागा व आर्थिक पाळबळ आणि दातृत्वाचा व मातृत्वाचा मानदंड असलेल्या मातोश्री कै.श्रीमती सरस्वतीबाई लाटकर यांच्या उदार देणगीतून बांधलेल्या वसतिगृहाचे उद्घाटन राजर्षींच्या हस्ते दिनांक २० मे, १९१५ रोजी झाले आणि अनेक स्थित्यंतरे पहात हां हां म्हणता वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी त्यांना पूर्वसुरीनी दिलेल्या संधीचे अक्षरशः सोने केले काहीनी तर आपल्या कुटुंबाचे, बोर्डींगचे तसेच देशाचे नाव जागतिक पातळीवर उंचावले.

## संस्थेची ठळक वैशिष्टये

- सर्व आधुनिक सोयीनियुक्त अशा वसतिगृहात गुणवत्तेनुसार १०६ विद्यार्थ्यांसाठी माफक फीमध्ये प्रवेश.
- सारस्वत विद्यार्थ्यांना तसेच इतर समाजातील आर्थिक दुर्बल विद्यार्थ्यांना फीमध्ये ५० टक्के सवलत.
- पिण्यासाठी शुध्द पाणी व अंघोळीसाठी गरम पाणी.
- अभ्यासिका, ग्रंथालय, ई लायब्ररी, प्रशस्त सभागृह इ. सुविधा
- निवासी विद्यार्थ्यांकरिता प्रबोधनपर मार्गदर्शक व्याख्याने, आरोग्य तपासणी, स्नेहसंमेलन, क्रिडा महोत्सव, राष्ट्रीय सण व गणेशोत्सव सारखे कार्यक्रम.
- वसतिगृह प्रांगणात ओपन जीम (खुली व्यायामशाळा) सुविधा.
- **वसतिगृहातील गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर निवासी शिष्यवृत्ती.**

## शैक्षणिक शिष्यवृत्ती :

१. कोल्हापूर, सांगली, सिंधुदुर्ग, रत्नागिरी या चार जिल्ह्यातील सारस्वत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, पारितोषिके आणि संशोधनासाठी अर्थसहाय्य

२. उच्च शिक्षणासाठी परतफेडीची शिष्यवृत्ती.

३. सारस्वत मान्यवरांनी संस्थेकडे दिलेल्या पुरस्कृत ठेवींवरील व्याजातून सारस्वत गुणवंत, तसेच गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना पारितोषिके.

QR CODE

### संस्थेचे बँक खाते

श्री सरस्वतीबाई गौड सारस्वत ब्राह्मण विद्यार्थी वसतिगृह
स्टेट बँक ऑफ इंडिया,
शाखा : दसरा चौक, कोल्हापूर
बँक खाते क्रमांक : १०९६७००३५९८
IFSC Code : SBIN0000413

## विश्वस्त मंडळ

**पदाधिकारी**

अध्यक्ष – श्री.मोहन नारायण देशपांडे
उपाध्यक्ष – श्री.सिध्दार्थ मनमोहन लाटकर
मा.सचिव – श्री.सुधीर चिंतामण कुलकर्णी
सहसचिव – श्री.अमित अरुण सलगर

**विश्वस्त**

श्री.संजय उर्फ बाबा पांडूरंग वाघापूरकर
डॉ.गजानन गोपाळ आसगेकर
ॲड.धनंजय रघुनाथ देशपांडे
श्री.संजीव राजाराम बोरकर
श्री.सचिन रामकृष्ण शानभाग

टीप – ज्या समाजबांधवाना वसतिगृहासाठी देणगी द्यावयाची आहे त्यांनी मा.सचिव यांचेशी संपर्क साधावा व देणगी रक्कम दिलेल्या QR कोड द्वारे संस्थेच्या खातेवर जमा करुन सहकार्य करावे.
(संपर्क :– श्री.सुधीर चिंतामण कुलकर्णी, मा.सचिव, फोन ०२३१-२६४४१११, मो.नं. ९९२१४३४९६४)

---

सार्व.न्यास.नों.क्र.एफ-५२४ स्थापना : १२/०६/१९७५

# सारस्वत विकास मंडळ, कोल्हापूर

२९६४, सी वॉर्ड, दसरा चौक, फोन नं. ०२३१-२६४४१११, कोल्हापूर ४१६ ००२.

Email : saraswatvikasmandalkolhapur@gmail.com

वसतिगृहाच्या स्थापनेनंतर पुढील काळामध्ये अनेक सामाजिक स्थित्यंतरे झाली. ज्याचा प्रभाव समाजावर पडून जीवनशैली, कुटुंबव्यवस्था, सामाजिक गरजांमध्ये बदल दिसू लागले. वसतिगृहासाठी काम करत असताना समाजधुरीणांना शिक्षणाव्यतिरिक्त इतरही सामाजिक गरजा व अडचणी लक्षात आल्या. सदर अडचणींचे निराकरण करणेसाठी व्यापक हेतूने कार्यरत संस्थेची गरज भासू लागली, म्हणून सारस्वत विकास मंडळ, कोल्हापूर या संस्थेची स्थापना करणेत आली. ही संस्था विविध सामाजिक उपक्रम यशस्वीपणे पार पाडत आहे.

## सामाजिक कार्यक्रम

- संक्रांत व हळदीकुंकू कार्यक्रम
- बालकांचे बोरन्हाण वेशभूषा स्पर्धा, ज्येष्ठ सदस्यांचा सत्कार इ.

## सांस्कृतिक कार्यक्रम :

- सामुदायिक गणेशोत्सव या कार्यक्रमातून समाज बांधवांना एकत्र आणणे व आपसातील वैचारिक, सामाजिक देवाण-घेवाण वाढवणे, यावर भर दिला जातो. संस्थेवरील समाजबांधवांचा जिव्हाळा वाढावा याकडे खास लक्ष दिले जाते. सदर कार्यक्रम उत्साहात साजरा केला जातो.
- हीच वेळ साधून विविध गुणदर्शन कार्यक्रमही घेतला जातो.
- गणेश विसर्जनाचे दिवशी महाप्रसादाचे आयोजन केले जाते.

## कौटुंबिक कार्यक्रम :

वधूवर व पालक परिचय मेळावा समाजातर्फे वधूवर सूचक केंद्र चालवले जाते. दर महिन्यांच्या दुसऱ्या व चौथ्या शनिवारी दुपारी ३ ते ५ या वेळेमध्ये वसतिगृहातील अभ्यासिकेत वधूवर नोंदणी व वधूवर विषयक माहितीची देवाण – घेवाण केली जाते. प्रतिवर्षी पाच वधूवर पालक परिचय मेळावे घेतले जातात. या मेळाव्यांची माहिती एसएमएसद्वारे देणेत येते. मेळाव्यातील उपस्थितांसाठी अल्पोपहार व चहापानाची विनामूल्य व्यवस्था केली जाते. नोंदणीसाठी वार्षिक शुल्क रु.३००/– घेतले जाते. मेळाव्यात सहभागी होणेसाठी वेगळे शुल्क आकारले जात नाही. मेळाव्यास मोठ्या प्रमाणात उपस्थिती असते. सदर मेळाव्यातून आजपर्यंत अनेक विवाह ठरले आहेत.

## सारस्वत विकास मंडळ (विश्वस्त मंडळ)

श्री. सचिन उर्फ कल्याण मंगेश जनवाडकर – अध्यक्ष
श्री. संजीव. रा. बोरकर – उपाध्यक्ष
श्री. मुकुंद. म. कुलकर्णी (गुंजीकर)
ॲड. शरद खासनीस – सहसचिव
श्री. गुरुनाथ. वि. देशपांडे – खजिनदार
श्री. गिरीश घोलकर – विश्वस्त
श्री. सुधीर. चिं.कुलकर्णी – विश्वस्त
श्री. दिपक देशपांडे – विश्वस्त
श्री. सुनील होळणकर – विश्वस्त,
श्री. विठ्ठल कुलकर्णी – निमंत्रित
सौ. माधवी देशपांडे – निमंत्रित

QR CODE

### संस्थेचे बँक खाते

सारस्वत विकास मंडळ,
कॅनरा बँक लक्ष्मीपुरी शाखा, कोल्हापूर
बँक खाते क्रमांक : ०३०४१०१००५२७९
IFSC Code CNRB0000304

टीप – ज्या समाजबांधवाना संस्थेच्या विविध सामाजिक उपक्रमासाठी देणगी द्यावयाची आहे त्यांनी मा. सचिव यांचेशी संपर्क साधावा व देणगी रक्कम खालील दिलेल्या QR कोड द्वारे संस्थेच्या खातेवर जमा करुन सहकार्य करावे. (संपर्क :– श्री. मुकुंद कुलकर्णी (गुंजीकर) सचिव मो.नं. ९४०४७००८२०)

# उदयोन्मुख सारस्वत उद्योजक



केशव प्रभू शिरोडकर



संगीता केशव शिरोडकर

केशव उर्फ उदय विठ्ठल प्रभू शिरोडकर यांनी पत्नी संगीता प्रभू शिरोडकर सोबत तेज शिरोडकर उद्योग, घरातूनच छोट्या प्रमाणात वेंगुर्ले येथे सुरू केला. काही वर्षानंतर वाढत्या मागणीमुळे घरगुती स्वरूपातील हा उद्योग १९९० मध्ये कुडाळ, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील औद्योगिकदृष्ट्या मागास भागात स्थलांतरित केला.

ही कंपनी हापूस आंबा, फणस, आवळा, कोकम, करवंद आणि जांभूळ या फळांवर प्रक्रिया करते. मँगो बार, हापूस आंबा पल्प, कोकम सरबत आणि आगळ, फणसाच्या चिप्स आणि बार्स, कैरी पन्हा, जामून ज्यूस आणि चिप्स, आवळा कँडी आणि सरबत, आले कँडी, गोड इमली, कलकत्ता मिठा पान, भरलेल्या मिरच्या इ. त्यांची लोकप्रिय उत्पादने आहेत. त्यांच्या उत्पादनाचे वैशिष्ट्य म्हणजे कच्चा माल थेट शेतकऱ्यांकडून खरेदी केला जातो. आंबा पल्प हा फक्त ताज्या हापूस आंब्यापासूनच बनविला जातो. कोणतीही रासायनिक प्रक्रिया न करता फळे नैसर्गिकरित्या पिकवली जातात. कच्च्या मालाच्या खरेदीपासून ते तयार उत्पादनापर्यंत प्रत्येक टप्प्यावर कडक गुणवत्ता नियंत्रण पाळले जाते. सर्व उत्पादने गुणवत्तेशी तडजोड न करता स्वच्छ वातावरणात उत्पादित केली जातात आणि मानक पॅकेजिंगमध्ये पॅक केली जातात.

उत्पादनांची विक्री महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक आणि इतर अनेक राज्यांमध्ये केली जाते. 'कोकण राजा' हे त्यांच्या उत्पादनांचे ब्रँड आहे. त्यांची मुले किरण व तेजस आणि स्नुषा सौ. दर्शनाही त्यांना व्यवसायात मदत करतात. कंपनीने सुमारे ३० व्यक्तींना, प्रामुख्याने स्थानिक महिलांना थेट रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. सध्या कंपनीची वार्षिक उलाढाल एक कोटी रुपये आहे आणि ती पुढील ५ वर्षात पंधरा कोटीपर्यंत नेण्याचे कंपनीचे उद्दिष्ट आहे. कंपनीला उद्योग विभाग, महाराष्ट्र सरकारकडून सर्वोत्कृष्ट उद्योग पुरस्कार, ललित जोशी मेमोरिअल अवार्ड यासारखे विविध पुरस्कार मिळाले आहेत.

अशा या होतकरू सारस्वत उद्योजकांचे आणि त्यांच्या कुटुंबाचे हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस खूप खूप शुभेच्छा!!!

# सारस्वत कुटुंबातील मुलांनी दहावीच्या परीक्षेत मिळवले देदीप्यमान यश!



श्रीमती सुलोचनादेवी सिंघानिया विद्यालय, ठाणे या शाळेतील विद्यार्थी अथर्व निलेश पोतदार याने यंदाच्या दहावीच्या आयसीएसई बोर्डात ९९.२ टक्के गुण मिळवून देदीप्यमान यश संपादन केलेले आहे.



विलेपार्ले महिला संघ ओरियन स्कूलमधील विद्यार्थी साकेत नीलेश नाबर याने दहावीच्या आयसीएसई बोर्डात ९९.२ टक्के गुण मिळवून शाळेत दुसरा क्रमांक मिळवला आहे. त्याच्या या कामगिरीबद्दल त्याचे मनःपूर्वक अभिनंदन व पुढील वाटचालीकरिता खूप खूप शुभेच्छा !



शर्वाणी संजय जोशी, डॉ. संजय जोशी आणि डॉ. गीता जोशी यांची सुकन्या, हिने यंदाच्या दहावीच्या परीक्षेत, आयसीएसई बोर्डात ९६.२ टक्के गुण मिळवून उज्वल यश संपादन केले आहे. त्याबद्दल शर्वाणीचे हार्दिक अभिनंदन आणि तिच्या पुढील वाटचालीसाठी अनेक शुभेच्छा !!



विलेपार्ले महिला संघ ओरियन स्कूलमधील विद्यार्थी अनिकेत नीलेश नाबर याने दहावीच्या आयसीएसई बोर्डात ९९ टक्के गुण मिळवून शाळेत तिसरा क्रमांक मिळवला आहे. त्याच्या या कामगिरीबद्दल त्याचे मनःपूर्वक अभिनंदन व पुढील वाटचालीकरिता खूप खूप शुभेच्छा !



पार्थ प्रफुल बोरकर याने मार्च २०२३ मध्ये झालेल्या दहावीच्या परीक्षेत ९८.६० टक्के गुण मिळवत उत्तम यश संपादन केले आहे. त्याच्या या कौतुकास्पद कामगिरीबद्दल त्याचे मनःपूर्वक अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी त्याला खूप खूप शुभेच्छा!



रिया कुंजन पत्की ही मार्च २०२३ मध्ये झालेल्या दहावीच्या परीक्षेत, एसएससी बोर्डात ९२.६ टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाली आहे. तसेच तिने सामाजिक विज्ञान या विषयात (९७/१००) सर्वोत्तम गुण मिळवले आहेत. त्याचबरोबर ती Infant Jesus School या शाळेतून दुसरी आली आहे. तिच्या या भूषणावह कामगिरीबद्दल तिचे हार्दिक अभिनंदन!



वेदांगी पाटकर या विद्यार्थीनीने दहावीच्या परीक्षेत, आयसीएसई बोर्डात ९६ टक्के गुण मिळवले असून इंग्लिश लिटरेचरमध्ये तिला १०० पैकी १०० गुण मिळाले आहेत. तिच्या या कौतुकास्पद कामगिरीबद्दल तिचे मनःपूर्वक अभिनंदन!



अथर्व मनीष पंडित हा फेब्रुवारी २०२३ मध्ये झालेल्या महाराष्ट्र बोर्डाच्या एचएससी (१२ वी) परीक्षेत ८८.६७ टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाला आहे. त्याच्या या यशाबद्दल त्याचे हार्दिक अभिनंदन!

# मृणालीचे विशेष यश...



मृणाली मयुरेश पाडगांवकर हिने नुकत्याच झालेल्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इम्युनोलॉजी NIIच्या निवड चाचणीत भारतात पहिल्या २० नामांकित विद्यार्थ्यांच्या यादीत येण्याचा मान पटकावला. NII ही भारतातील नामांकित सखोल अभ्यास संस्था (Research Institute) आहे. NIIच्या पूर्व परिक्षेत उत्तीर्ण होऊन आलेल्या विद्यार्थ्यांची दोन फेऱ्यात निवड करण्यात आली. निवड करण्याच्या प्रक्रियेत ९ नामवंत पॅनेल सदस्यांनी मुलाखत घेऊन अंतिम २० विद्यार्थ्यांची यादी जाहीर केली. या यादीत मृणालीचा १०वा क्रमांक आहे.

NII या नामवंत संस्थेत मृणाली कर्करोग प्रतिकारक्षमता (Cancer Immunology) या विषयावर Ph.D. करणार आहे. या अभ्यासक्रमासाठी मृणालीची १००% शिष्यवृत्ती या स्वरूपात निवड झाली आहे. मृणालीच्या शैक्षणिक घोडदौडीत तिने प्राप्त केलेल्या १०वी, १२वी, पदवी व पदवीधर यशाला सारस्वत चैतन्य या संस्थेने नेहमीच गौरवपर आशीर्वाद दिला आहे.

## माझा महाराष्ट्र

महाराष्ट्र हा आहे माझा, मी पण आहे त्यांचा
भाषा त्याची फक्त मराठी, ज्वलंत बाणा त्याचा ।।१।।

स्वराज्य स्थापन करी आमुचा राजा शुर शिवाजी
त्याच्या संगे उभे राहिले तानाजी अन् बाजी ।।२।।

चोखा, नाम्या, रामदास, जनी, अन् गोरा कुंभार
एकनाथ अन् तुका, सावता, मुक्ता, ज्ञानेश्वर ।।३।।

संताची ही पावन भूमी देते समतेचा संदेश
जाती पाती गाडून टाका, नको कुणाचा द्वेष ।।४।।

लोकमान्य, सावरकर, शाहू आणि ज्योतीबा फुले
आगरकर, रानडे, गोखले आणि कितीक झाले ।।५।।

धोंडो कर्वे, पां.बा. काठो, डॉक्टर आंबेडकर
भावे विनोबा, भिमसेन जोशी, लता, तेंडूलकर ।।६।।

इथे जन्मली भारतरत्ने, अभिमान तयांचा धरू
नम्रपणे या सर्वांना, आपण वंदन करू ।।७।।



पु.लं., अत्रे, दळवी आणि वि. स. खांडेकर
कुसुमाग्रज, नेमाडे, विंदा, तसेच पाडगांवकर ।।८।।

किती घेऊया नावे हे तर साहित्यातील वीर
जीवन झाले सार्थक मानू त्यांच्यापरी उपकार ।।९।।

जरी असलो महाराष्ट्राचे तरीही सदैव ध्यानी ठेवू
अखंडता भारतमातेची प्राणपणाने टिकवू ।।१०।।

**- किशोर रांगणेकर**


Prosperise
BUSINESS CONSULTANCY LLP
START
YOUR BUSINESS
IN DUBAI (UAE)
Options for incorporating companies
Dubai Mainland Company
Free Zone Company
Offshore Company
Contact Rohan Tendulkar
rohan@prosperise.in
+91 7738990548
1, Matruchaya, GV Scheme Road No 1,
Mulund East, Mumbai- 400081
www.prosperise.in


TRUGROW
FINVEST
True to your financial growth
Just like a captain of the ship
needs a navigator who helps him
navigate the high seas,
Trugrow helps you to navigate
the volatile world of finance & investments
Trugrow Finvest Services Pvt. Ltd.
AMFI registered mutual fund distributor
Contact Amit Pandit
amit@trugrowfin.com
+91 9820127898
www.trugrowfin.com
1, Matruchaya
GV Scheme Road No 1,
Mulund East, Mumbai- 400081
201, Shree Sail
Ram Mandir Road
Vile Parle East, Mumbai- 400057

# सारस्वत चैतन्य दिवाळी विशेषांक - २०२३

## कथा व कविता स्पर्धा!

सारस्वत चैतन्य त्रैमासिकाच्या वतीने या वर्षीच्या दिवाळी विशेषांकाकरिता काव्य आणि कथा स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे. स्पर्धांचे नियम खालीलप्रमाणे :

१. कविता किंवा कथा स्वरचित, स्वलिखित असावी.
२. लेखक सारस्वत चैतन्य त्रैमासिकाचा देणगीदार/ जाहिरातदार असणे/ होणे आवश्यक आहे.
३. कथेची शब्दमर्यादा जास्तीत जास्त १००० शब्दांपर्यंत असावी.
४. कविता, कथेसोबत आपला मोबाईल नंबर व पूर्ण पत्ता लिहावा.
५. परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.
६. काव्यस्पर्धेच्या पहिल्या तीन विजेत्यांना अनुक्रमे रु. १५००, १००० व ५०० तर कथास्पर्धेच्या पहिल्या तीन विजेत्यांना अनुक्रमे रु.२०००, १५०० व १००० व त्यासोबत प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात येईल.
७. ही पारितोषिके १० डिसेंबर २०२३ रोजी मडगाव - गोवा येथे भरणाऱ्या सारस्वत चैतन्य गौरव पुरस्कार सोहळ्यात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रदान करण्यात येतील. सोहळ्याला विजेत्यानी स्वखर्चाने हजर राहायचे आहे. जे विजेते उपस्थित राहू शकणार नाहीत, त्यांना त्यांचे पारितोषिक कुरियरने पाठवले जाईल.
८. स्पर्धकांनी आपली अप्रकाशित कविता किंवा कथा chaitanyamag@gmail.com या ईमेलवर पाठवावी. किंवा 9869151089 या क्रमांकावर व्हाटस् ॲप करावी.कथा/ कविता पाठविण्याची अंतिम तारीख ३० सप्टेंबर २०२३ आहे. त्यानंतर आलेल्या कथा/ कवितांचा स्पर्धेसाठी विचार केला जाणार नाही.

YASHAM
YASHAM SPECIALITY INGREDIENTS PVT LTD
Industries Catered

PERSONAL CARE
FOOD AND NUTRACEUTICALS
VETERINARY
CONSTRUCTION
PHARMACEUTICAL
BEYOND CHEMICALS BUILDING PARTNERSHIP
YASHAM SPECIALITY INGREDIENTS PVT LTD
401, Satya Dev, Plot No A-6, Veera Industrial Estate, Off Veera Desai Road, Andheri (W), Mumbai - 400 053
**Tel.:** 91-22-4063 9900, **Fax:** 91-22-4063 9901, **Email :** yasham@yasham.in, **Website :** www.yasham.in
*We encourage your research & help sourcing your new requirements*

**देणगीदार फॉर्म**

# सारस्वत प्रकाशन

(Reg. No. under Bombay Public Trust Act 1950 - E-13364)

१०, सारस्वत भवन, छत्रपती शिवाजी महाराज पथ, (मोगल लेन), माहीम, मुंबई – ४०० ०१६

वेबसाईटचा पत्ता : www.saraswatprakashan.org Email : chaitanyamag@gmail.com

All Donations (Except Cash Donations above Rs. .2000/- ) are eligible for 50% exemption from Income Tax under Sec. 80G of the Income Tax Act, 1961 vide **Regn. No. AAGTS6431DF20231** dtd. 28-02-2023 of the Director of Income Tax Exemption, Mumbai **valid till 31-03-25** PAN NO. :- **AAGTS6431D**

कार्यवाह, दिनांक : _____ / _____ / 20 ___

सारस्वत प्रकाशन, मुंबई

मी / आमची संस्था / कंपनी, आपल्या सामाजिक संस्थेच्या उपक्रमासाठी देणगी देत आहे. सदर देणगीचा विनयोग संस्थेच्या उद्दिष्टपूर्तीसाठी करण्यात यावा ही विनंती.

१. संपूर्ण नाव : ______________________________

२. घरचा पत्ता : ______________________________

______________________________

३. ई-मेल आयडी : ____________________ मोबाईल क्र.: ____________

४. जन्मतारीख : ____________________ गोत्र: ____________

५. कुलदैवत व ठिकाण : ______________________________

६. ज्ञातिघटक : ______________________________

(माहीत असल्यास – कुडाळदेशकर, भालावलीकर, बारदेशकर, शेणवी, चित्रापूर, राजापूरकर, पेडणेकर, साष्टीकर यापैकी )

७. पॅन कार्ड (आवश्यक) : ______________________________

८. देणगी रक्कम : ____________________ श्रेणी : ____________

खालील तीन पैकी कोणत्याही एका प्रकारे आपण देणगी रक्कम अदा केली आहे. .

- ☐ अ. UPI पेमेंट :- संस्थेचा मोबाईल क्र. **8779758085** किंवा QR कोड वापरून
- ☐ आ. NEFT :- IFSC कोडसह बँकेचा तपशील वापरून
- ☐ इ. धनादेश :- **'सारस्वत प्रकाशन'** / **SARASWAT PRAKASHAN** ह्या नावाने धनादेश काढून

Bank Account Details:
**SVC Co-operative Bank Ltd.**
Matunga Branch,
Saving Account no.
**100503130013891**
IFS code : **SVCB0000005**

आपला विश्वासू

सही

टीप : १) नको असलेला मजकूर खोडावा. २) अधिक माहितीसाठी मागील पानावर पाहावे. ३) ८०जी अंतर्गत देणगीदारांना पॅन कार्ड क्रमांक देणे आवश्यक आहे.

सारस्वत चैतन्य

स्थापना: एप्रिल १९८६

- ➢ सकल सारस्वतांमध्ये सुसंवाद साधण्याच्या हेतूने १९८६ पासून कार्यरत संस्था
- ➢ दर्जदार सारस्वत चैतन्य त्रैमासिकाचे अव्याहत ३८ वर्षे प्रकाशन.
- ➢ मुंबई मराठी वृत्तपत्र लेखक संघाचे २००३, २००४ साली उत्कृष्ट दिवाळी अंक म्हणून पुरस्कार.
- ➢ २०१० नंदा फाऊंडेशन पुरस्कार
- ➢ १९९४ **'गौड सारस्वत परिचय'** ग्रंथ प्रकाशन.
- ➢ १९९६ मुंबईत एक दिवसाचे जी. एस. बी. संमेलन संपन्न
- ➢ २००३ 'सारस्वत भातीय संस्कृतीचे उपासक"- गो. म. लाड लिखित पुस्तकाचे प्रकाशन
- ➢ २००० सालापासून सातत्याने सारस्वत चैतन्य गौरव सोहळ्याच्या यशस्वी आयोजनातून कर्तुत्ववान सारस्वत व्यक्तींचा सन्मान

## या सामाजिक उपक्रमात देणगीदार म्हणून सहभागी व्हा व 'सारस्वत चैतन्य' त्रैमासिक तहाहयात घरपोच मिळवा.

| देणगीदार : | आधारस्तंभ | आश्रयदाता | हितचिंतक | गौरव सोहळा |
|---|---|---|---|---|
| व्यक्ती | ₹ १०,००० | ₹ ६,००० | ₹ ३,५०० | **₹ २५,०००** |
| संस्था | ₹ २०,००० | ₹ १२,००० | - | - |
| कुटुंब * / स्मृत्यर्थ * | ₹ २०,००० | ₹ १२,००० | - | - |

- ❖ एखाद्या व्यक्तीच्या स्मृतीप्रीत्यर्थ तिच्या नावाने कुटुंबीयांनी देणगी दिल्यास त्यांना **'कै. ___ यांचे कुटुंबीय'** किंवा **'सौ. व श्री. ____ आणि कुटुंबीय'** अशा नावाने **'सारस्वत चैतन्य'** त्रैमासिकाचे आधारस्तंभ / आश्रयदाते होता येईल.
- ❖ व्यक्ती या देणगीदार प्रकारातील आधारस्तंभ, आश्रयदाता यांची नावे सदरील व्यक्ती हयात असेपर्यंत अंकात छापली जातील.
- ❖ संस्था व कुटुंब (स्मृत्यर्थ ) आधारस्तंभ, आश्रयदाते या देणगीदार प्रकारातील नावे अंकात कायम स्वरूपात छापली जातील.
- ❖ सर्व देणगीदारांची नोंद एक अंकात घेतली जाईल.
- ❖ देणगीदारांना **'सारस्वत चैतन्य'** त्रैमासिकाचा अंक तहहयात पाठविला जाईल.
- ❖ याबरोबर पूर्वीच्या तहहयात वर्गणीदारांनी (₹ २००/- वा ₹ २५०/- इत्यादी दिलेल्यांनी) वरीलप्रमाणे देणगी देऊन सहकार्य करावे.
- ❖ या व्यतिरिक्त शुभेच्छा देणगी / स्मृतीप्रीत्यर्थ देणगी या अन्य कोणत्याही कार्यासाठी दिलेल्या देणगीच स्वीकार केला जाईल. सादर देणगीचा उल्लेख ज्या अंकात प्रसिद्ध केला जाईल त्याची प्रत देणगीदाराला पाठविली जाईल.

(पान १२ वरून) देशपांडे यांनी युवा वर्गाचे आरोग्य सुदृढ राहण्याकरिता योग किंवा मल्लखांब यांसारखे शिक्षण द्यावे, असे सुचविले. सारस्वत दीनवत्सल संघाचे कार्यवाह प्रवीण रेगे यांनी आपल्या संस्थेची माहिती देऊन, या प्लॅटफॉर्मचा वापर वैद्यकीय मदत घेण्याबाबत कसा करता येईल, यावर आपले विचार मांडले. 'या सभेचा वृत्तांत आणि संकल्पना सर्व उपस्थित पदाधिकाऱ्यांना पाठवाव्यात, जेणेकरून ते पदाधिकारी या संकल्पना आपल्या व्यवस्थापक मंडळासमोर मांडतील', असे कॅनरा सारस्वत असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी नमूद केले. 'ह्युमन बँक तयार करावी', असे मंदार कानविंदे यांनी सुचविले. विवाहसंस्थेबाबत काउन्सेलिंग करण्याची गरज आहे, असे मत उदय रेडकर यांनी मांडले. मयुरेश पाडगांवकर यांनी आपले सहकार्य संस्थेच्या माध्यमातून व व्यक्तिगतरीत्याही राहील, याची ग्वाही दिली.

सारस्वत प्रकाशनचे अध्यक्ष दिलीप भिसे यांनी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी मांडलेल्या सर्व संकल्पनांचा आढावा घेतला आणि सर्व संस्थांनी सकारात्मक दृष्टीकोन दाखविल्याबद्दल सर्वांचे आभार मानले.

**- दीपक मुळ्ये**

**या संयुक्त सभेत सहभागी झालेल्या संस्था व त्यांचे पदाधिकारी / प्रतिनिधी पुढीलप्रमाणे -**

**सारस्वत प्रकाशन :**
श्री. दिलीप भिसे, श्री. प्रमोद तेंडुलकर, श्री. राहुल साखळकर, श्री. प्रसाद कुलकर्णी, श्री. दीपक मुळ्ये आणि श्री. मयुरेश पाडगांवकर

**सारस्वत चेंबर्स ऑफ कॉमर्स :**
श्री. सिद्धार्थ सिनकर, श्री. मंदार कानविंदे आणि श्री. संजय किणी

**ऑल इंडिया सारस्वत कल्चरल ऑर्गनायझेशन :**
डॉ. अजित गुंजीकर, श्री. उदय रेडकर आणि श्री. राजेंद्र पै

**सारस्वत हितवर्धक मंडळ :**
श्री. देविदास सिनकर, श्री. उल्हास साखळकर आणि श्री. अशोक सिनकर.

**दी गौड सारस्वत को-ऑप क्रेडिट सोसायटी :**
श्री. सुहास पोतकर, श्री. राधाकृष्ण तेंडुलकर

**सारस्वत ब्राह्मण समाज :** श्री. सुभाष कामत

**सारस्वत दीनवत्सल संघ :** श्री. प्रवीण रेगे

**एस. पी. पब्लिकेशन :** श्री. सुनील रेगे

**नॉर्थ कॅनरा जी. एस. बी. संघ :** श्री. वामन नाडकर्णी.

**समर्थ व्यायाम मंदिर :** श्री. उदय देशपांडे

**कॅनरा सारस्वत असोसिएशन :**
श्री. गौतम अमलाडी, श्री. हेमंत कोमब्राबैल

**गौड ब्राह्मण सभा :** श्री. जगदीश वालावलकर

**गौड ब्राह्मण समाज :** श्री. मनीष दाभोळकर

**बारदेशकर जी. एस. बी. निधी :** श्री. विनायक शिरोडकर आमी गोंयकर श्री. सागर सावर्डेकर.






The name Dempo is bound-up with Goan history for half a millennium. The Dempos were then renowned for agriculture, trading, imports, and underwriting besides social responsibility.


Today, DEMPO moves ahead, a confident, caring conglomerate, reaping the practice of business tempered with ethics in each of their existing lines of activity, while staying wedded to their core values as they venture into planned lines of Industrial activity, new and emerging businesses. The Group firmly believes in ethical and transparent Corporate Governance which is critical to the long-term success and ability to create value for the stakeholders.

The Group is committed to creating a more sustainable enterprise. Besides business performance, the group also makes significant investments in community engagements through the implementation of various meaningful philanthropic programmes. Corporate Governance and ethical management have always been the guiding principles of carrying out the business at Dempo.

## DEMPO Group of Companies

Corporate Office : Dempo House, Campal, Panaji - Goa 403 001.
Tel : 0832 - 2226281 / 862441300 / 457
Fax : 0832 - 2225098 / 2228588
E-mail : mail@dempos.com Website : www.dempos.com

Goa Carbon I Devashri Nirman - Real Estate I Dempo Shipbuilding & Modest Infrastructure I Navhind Papers & Publications & Goa 365 I Dempo Travels I Hindustan Foods I Dempo Sports Club I Dempo Charities & Education I Mahamaya Farms I Motown Trading I Mewo Co-working


WHO GMP CERTIFIED • ISO 9001:2015 & ISO 13485:2016 CERTIFIED
ENTOD
SINCE 1977
A Speciality Pharmaceutical Wellness Company like No other
"We strive for a day when our innovations will take us beyond traditional symptomatic therapeutics. And that day, there will be no medicines; only prophylaxis, diagnosis and cure"
- Late G.V. Masurkar
Founder
Experts in Ophthalmic, ENT & Paediatric Pharmaceutical Wellness
Over 130 Commercially Available Finished Products
International Formulation R&D Centres
Patient-Centred Innovations since 1977
Scan QR Code:
ENTOD PHARMACEUTICALS LTD
Head Office: Ashirwad Building, S.V.Road, Opp. Badi Masjid, Bandra (W), Mumbai-400050.
Tel.: (+91) 22 – 26423608/ 22-226442052 Fax.: (+91) 22-26441056
E-mail: feedback@entodpharma.com • www. entodinternational.com
Part of
Entod
INTERNATIONAL

Registrar of Newspapers, New Delhi
SARASWAT CHAITANYA
Regd. No. : 46921/87
Posted At- Mumbai Patrika Chanel
Sorting Office Mumbai - 400 001




Printed & Published by Rahul Ramkrishna Sakhalkar, for Saraswat Prakashan, Saraswat Bhavan, 2nd floor, Room no. 10, Chhatrapati Shivaji Maharaj Road ( Mogal lane), Mahim ( West), Mumbai -400016 Printed at New Rajkamal Printing Press, 305 Retiwala Industrial Estate H. A. Palav Road, Byculla (East), Mumbai -400027
Editor - Sudhakar Vasant Lotlikar ●year 38 ●Issue 2 ● July-September 2023 ●Pages 48 ●Price 20 Rupees